cmyk

## संपादकीय

### स्त्रीत्वाच्या अपमानाची चाड ठेवा !

निवडणूक, मग ती कोणतीही असो, आली की, सगळ्याच राजकीय पक्षांना महिला सबलीकरण, महिलांचा सन्मान व नारीशक्तीचे वंदन वगैरे बाबी अत्यंत प्रकर्षाने आठवतात! मात्र, याच नारीशक्तीवरील अन्याय, अत्याचाराबाबत राजकीय पक्ष प्रत्यक्षात कसे आपल्याला सोयीचे राजकीय वर्तन करतात याचा किळसवाणा अनुभव सध्या कर्नाटकातील प्रकरणावरून सामान्यांना येतो आहे. विशेष म्हणजे हे सगळे लोकसभा निवडणुकीचा हंगाम ऐन भरात आलेले असताना घडते आहे. प. बंगालमध्ये संदेशखाली येथे घडलेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणाचा करावा तेवढा निषेध कमीच.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### वंचितच्या शिर्डी येथील उमेदवाराच्या वाहनावर हल्ला

शिर्डीः वंचित बहुजन आघाडीच्या शिर्डी लोकसभा मतदारसंघातील उमेदवार उत्कर्षा रुपवते यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात गाडीच्या समोरील काचा फुटल्या असून, उत्कर्षा रूपवते सुखरूप असल्याची माहिती आहे. झाडीतून दगडफेक करत हा हल्ला करण्यात आला. दगडफेकीनंतर हल्लेखोर पळून गेले. शिर्डी मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीच्या उत्कर्षा रुपवते यांचा जोरदार झंझावात सुरू असल्यानेच राजकीय सुडातून हा हल्ला झाला असल्याचे बोलले जाते. प्रस्थापित उमेदवारांना रूपवते यांचा निवडणुकीत धोका वाटत असल्याची चर्चा सुरू आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२७ | बुधवार दि.८ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# सोळा मे पुर्वी कापूस बियाणे विकल्यास कारवाई

## कृषी विभागाकडून विशेष खबरदारी

पुणे । प्रतिनिधी

राज्यात कापूस लागवड हंगामाबाबत राज्य सरकारच्या कृषी विभागाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. यंदाच्या खरीप हंगामात कापूस पिकावर अळींचा प्रादुर्भाव होऊ नये. यासाठी १६ मे २०२४ पासून कापूस बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध होणार आहे. त्यापूर्वी बियाण्याची विक्री केल्यास संबंधित कंपनी, किरकोळ विक्रेत्यावर कारवाई होणार आहे. यासंदर्भात कृषी विभागाने



विभागीय कृषी सहसंचालक यांना आदेश निर्गमित केले आहेत. त्यामुळे आता कृषी विभागाकडून कापूस पिकावरील कीड नियंत्रणासाठी विशेष प्रयत्न केले जात असल्याचे पाहायला मिळत आहे.

कृषी विभागातील तज्ज्ञांच्या मते, शेंदरी बोंड अळीचा जीवनक्रम खंडित न झाल्याने प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसून येते. हंगाम पूर्व कापूस लागवड झाल्यास

◀◀ पान २ वर

### १ जून नंतरच लागवड करा...

कापूस बियाण्याची विक्री दुकानदार शेतकऱ्यांना १५ मे नंतर करू शकतात. परंतु शेतकऱ्यांनी बोंड अळीचा प्रादुर्भाव होऊ नये, याकरिता १ जून नंतरच कापूस बियाण्याची लागवड करावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## केजरीवाल यांना काही अटीवर जामीन दिला जाऊ शकतो - सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अंतरिम जामीन द्यायचा की नाही यावर सर्वोच्च न्यायालय विचार करत आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने मंगळवारी सांगितले की, अरविंद केजरीवाल यांना अंतरिम सवलत फक्त त्या अटीवरच दिली जाईल की ते कोणतेही अधिकृत कर्तव्य बजावणार नाहीत कारण त्याचा ''कॅस्केडिंग प्रभाव'' होऊ शकतो. परिस्थिती ''असामान्य'' असल्याचे प्रतिपादन करून न्यायाधीशांनी असे निदर्शनास आणले की लोकसभेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी एकदा होतात.

पुढे न्यायमुर्ती संजीव खन्ना आणि दीपंकर दत्ता यांनी पुढे बोलताना सांगितले की, ''अंतरिम जामीन मंजूर करताना, आम्ही तपासणी करत आहोत की, त्याचा काही गैरवापर होईल की नाही किंवा ती व्यक्ती कठोर गुन्हेगार आहे का? येथे तसे नाही,'' न्यायमूर्ती खन्ना यांनी कारवाई दरम्यान सांगितले.

◀◀ पान २ वर

### » अंबाजोगाईच्या विराट जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मागितले जनतेचे आशीर्वाद

# गोपीनाथजी मुंडे यांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी बेटी पंकजावर सोपवलीयं

## मागील सर्व रेकॉर्ड मोडीत काढून पंकजाताई मुंडे यांना रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी करण्याचं पंतप्रधानांचं आवाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

गोपीनाथजी मुंडे आणि माझे नाते स्नेहाचे होते, म्हणूनच देशाने जेव्हा २०१४ मध्ये मला पहिल्यांदा सेवा करण्याची संधी दिली, त्यावेळी बीडमधून गोपीनाथ मुंडे विजयी झाल्यानंतर त्यांना दिल्लीमध्ये सोबत काम करण्यासाठी घेऊन गेलो होतो, मात्र नियतीने घात केला आणि मुंडेजी आपल्या सर्वापासून हिरावले गेले. मात्र आता दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी मी 'बेटी पंकजा'' मुंडेंवर सोपवली आहे, त्यामुळे येत्या १३









तारखेला पंकजा मुंडे यांना आपण प्रचंड मताधिक्यांनी विजयी करावे असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले. भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आज कृषी महाविद्यालयाच्या विस्तीर्ण मैदानावर पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची जाहीर सभा झाली. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष

◀◀ पान २ वर

## मराठा समाजाच्या आरक्षणावर सरकार सकारात्मक–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

महायुतीच्या तळपत्या विजयात विरोधकांची लंका जळून भस्म होणार आहे. २१ व्या शतकातील सक्षम भारताच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींसारख्या सक्षम नेतृत्वाच्या पाठीशी खंबीर उभे राहण्यासाठी बीड लोकसभा



मतदारसंघातून आमचे मित्र गोपीनाथराव मुंडे यांच्या कन्या पंकजाताई मुंडे यांना विक्रमी मतांनी विजयी करा. बीड जिल्ह्यातून एक इतिहास निर्माण करा. बीडमध्ये येत्या ४ जूनला तुतारी उचलून फेका..तिची

◀◀ पान २ वर

## पंतप्रधानांनी खा.प्रीतमताईंच्या डोक्यावर हात ठेवून दिला आशीर्वाद

व्यासपीठावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी सर्वांना नमस्कार केला. यादरम्यान खासदार प्रीतमताई मुंडे त्यांना दिसल्या नाही, तेव्हा त्यांनी 'प्रीतम कहा है' अशी विचारणा पंकजा मुंडे यांच्याकडे केली. प्रीतम ताई सूत्रसंचालन करत असल्याचे पंकजाताई मुंडे यांनी सांगितल्यानंतर मोदीजींनी त्यांच्या भाषणाच्यावेळी प्रीतमताईंच्या डोक्यावर हात ठेवून त्यांना आशीर्वाद दिले. या भावनिक क्षणाने उपस्थित भारावून गेले.

## देशाचं संविधान कोणी बदलू शकणार नाही–ना.रामदास आठवले

'बीड जिल्ह्यात विकासाची गायची असेल अंगाई तर संसदेत पाठवा आपली पंकजाताई' असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींशिवाय देशाला पर्याय नाही. कोणीही संविधान बदलणार नाही या बुद्धिभेदाला कोणी बळी पडणार नाही. राहुल गांधीच्या भाषणावर बंदी आणावी अशी मागणी निवडणूक आयोगाकडे आपण केलेली आहे.काँग्रेस तुम्हाला भडकावण्याचं काम करत आहे.पण त्यांना कोणी भीक घालणार नाही. पंकजाताई प्रचंड मताधिक्याने विजयी होणार असा मला विश्वास असल्याचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी सांगितले.

सर्व जातीधर्माला सोबत घेऊन चालणारे गोपीनाथ मुंडे होते.नामांतर चळवळीत प्रमोद महाजन व

◀◀ पान २ वर

## मोदींजींची सभा विजयाचा संकल्प करण्याची नसून पंकजाताईंच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी–धनंजय मुंडे

बीड जिल्ह्यात जवळपास सात लाखापेक्षा अधिक हेक्टर शेती ही जिरायती आहे. गोदावरीचे १६५ टीएमसी तुटीचे खोरे भरून काढण्याच्या प्रकल्पास महायुती सरकारने तत्वतः मान्यता दिलेली आहे. हे तुटीचे खोरे भरून काढल्यास बीड जिल्ह्याला किमान ४२ टीएमसी इतके पाणी मिळेल. हा प्रकल्प पूर्णत्वास गेल्याने बीड जिल्ह्यातील बहुतांश शेती ही बागायती होणार आहे. या प्रकल्पाचा अंदाजे प्रस्तावित खर्च एक लाख १७ हजार कोटी इतका असून, राज्य व केंद्र सरकारच्या एकत्रित अर्थसहाय्य याचबरोबर अन्य बँकांच्या अर्थसहाय्याने हा प्रकल्प पूर्ण करायचा

◀◀ पान २ वर



## मतदारांनो,जातीय सलोख्याची तस्करी होऊ देऊ नका-पंकजाताई मुंडे

ही निवडणूक देशाचे आणि जिल्ह्याचं भलं करण्यासाठी विकासाच्या मुद्यावर आपल्याला लढवायची आहे. त्यामुळे मतदारांनो, निवडणूकीत जातीय सलोख्याची तस्करी होऊ देऊ नका. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या जिल्ह्यात मतदानरूपी आशीर्वाद घेण्यासाठी आले आहेत.मोदींकडे आग्रह करून ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या हातातील कोयता काढून घेण्यासाठी आगामी काळात मी प्रयत्न करणार आहे. मोदीजींची परवानगी समजून मुस्लिमांना वचन देते की, हा देश जेवढा तुमच्या आजोबा पणजोबांचा आहे तेवढाच तुमचा देखील राहिल. बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मला आपले मतरुपी आशीर्वाद द्या, तुमचे मत विकासासाठी सत्कारणी लावेल अशी ग्वाही

◀◀ पान २ वर




### भारत निर्माणच्या दिशेने एक पाऊल..

# बीडमध्ये आज अतिभव्य उर्दू मुशायरा आणि कवी संमेलन

### कॉमेडी किंग एहसान कुरेशी यांच्यासह देशातील प्रसिध्द कवींची उपस्थिती; मोठ्या संख्येने उपस्थित रहा–सलीम जहाँगिर

बीड । प्रतिनिधी

जहाँगिर एज्युकेशनल, सोशल ॲण्ड वेल्फेअर फाऊंडेशन यांच्या वतीने भारत के निर्माण में एक कदम या टॅगलाईनसह अतिभव्य अखिल भारतीय उर्दू कवी संमेलन (मुशायरा) आज दि.८ मे रोजी सायंकाळी ६ ते १० या वेळेत श्री छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण (मल्टीपर्पज ग्राऊंड) बीड येथे आयोजीत करण्यात आला आहे. या भव्य संमेलनात कॉमेडी किंग एहसान कुरेशी यांच्यासह देशभरातील नामवंत कवी / शायर उपस्थित राहणार आहेत. या कवी संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जहाँगिर एज्युकेशनल, सोशल ॲण्ड वेल्फेअर फाऊंडेशनचे अध्यक्ष





सलीम जहाँगीर यांनी केले आहे.

भारतातील नामवंत कवी / शायर ऐतिहासिक आणि प्राचीन परंपरा लाभलेल्या बीड शहरातील सामाजिक एकतेवर होणार्या या उर्दू कवी संमेलन (मुशायरा) साठी उत्तर प्रदेशचे नदीम फर्रूख, देवबंदी येथील डॉक्टर माजीद, हाशिम फिरोजाबादी, उत्तराखंडचे सज्जाद झंझट, अमरावतीचे जावेद इशाअती, कानपुरच्या शबीना अदीब, उत्तराखंडच्या निकहत अमरोही, नैनीतालच्या तरन्नुम निशात, हे उपस्थित राहणार आहेत. या कवी संमेलनाचे प्रमुख आकर्षन कॉमेडी किंग एहसान कुरेशी असणार आहेत.बुधवार दि.८ मे रोजी सायंकाळी ६ वाजता हे संमेलन / मुशायरा सुरू होणार आहे. महिलांना बसण्यासाठी स्वतंत्र्य व्यवस्था करण्यात आली आहे.

◀◀ पान २ वर






cmyk

अग्रलेख

# स्त्रीत्वाच्या अपमानाची चाड ठेवा !

निवडणूक, मग ती कोणतीही असो, आली की, सगळ्याच राजकीय पक्षांना महिला सबलीकरण, महिलांचा सन्मान व नारीशक्तीचे वंदन वगैरे बाबी अत्यंत प्रकर्षाने आठवतात! मात्र, याच नारीशक्तीवरील अन्याय, अत्याचाराबाबत राजकीय पक्ष प्रत्यक्षात कसे आपल्याला सोयीचे राजकीय वर्तन करतात याचा किळसवाणा अनुभव सध्या कर्नाटकातील प्रकरणावरून सामान्यांना येतो आहे. विशेष म्हणजे हे सगळे लोकसभा निवडणुकीचा हंगाम ऐन भरात आलेले असताना घडते आहे. प. बंगालमध्ये संदेशखाली येथे घडलेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणाचा करावा तेवढा निषेध कमीच.

मात्र, त्यावरून रान पेटवून टाकत असलेला भाजप, जो की स्वत:च्या चारित्र्यसंपन्नता, साधनशुचिता, स्त्रीदाक्षिण्याचा कळवळा असल्याचा पदोपदी दावा करतो. कर्नाटकातील मित्रपक्ष जेडीएसचे खासदार प्रज्वल रेवण्णा याच्या विकृत व लिंगपिसाट कृत्यांचा भांडाफोड झाल्यावर त्यावर मात्र सोयीस्कर मौन बाळगतो. टीकेचा भडिमार सुरू झाल्यावर या प्रकरणाशी आपला काहीच संबंध नसल्याचे सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न करतो. या प्रकरणाशी भाजपचा प्रत्यक्ष संबंध नसेलही मात्र ज्याने हे सगळे घडविले त्या प्रज्वल रेवण्णाशी असणाऱ्या भाजपच्या संबंधाचे काय? या रेवण्णाचे राजकीय अस्तित्व निर्माण करण्यासाठी याच भाजपने केलेल्या मोठ्या राजकीय गुंतवणुकीचे काय? आपले लैंगिक गुन्हे उघडकीस आल्यावर हा प्रज्वल रेवण्णा रातोरात जर्मनीस पळून गेला. हे त्याच्या पलायनाकडे केंद्रीय यंत्रणांनी सोयीस्कर दुर्लक्ष केल्याशिवाय शक्य आहे का? मात्र, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा याचे खापर कर्नाटकातील सरकारच्या डोक्यावर फोडून हात झटकण्याचे कौशल्य अत्यंत तत्परतेने दाखवतात. अर्थात हे धाडस शहा यांच्यात येण्याचे कारण म्हणजे विरोधक राजकारणापोटी आरोप करत असल्याचे सेट करण्यात आलेले नॅरेटिव्ह. विरोधकही आपले आरोप प्रत्यक्ष ठोस पुराव्यांद्वारे सिद्ध करू शकत नाहीत त्यामुळे पीडित महिलांना न्याय मिळण्याचा प्रमुख मुद्दा या राजकीय साठमारीत हद्दपार होतो व राजकीय चिखलफेकीला ऊत येतो. हेच संदेशखाली प्रकरणात घडले आणि आता तेच कर्नाटकातील माजी पंतप्रधान देवेगौडा यांच्या दिवट्या नातवाने घडविलेल्या प्रकरणातही घडते आहे. कर्नाटकात सध्या सत्तेवर असणाऱ्या काँग्रेस पक्षाने या प्रकरणाची तातडीने दखल घेतली व चौकशीचे आदेश दिले हे योग्यच. मात्र, हीच तत्परता संदेशखाली प्रकरणात ममता बॅनर्जींनी दाखवावी असा आग्रह या पक्षाने का धरला नाही? वा अशी तत्परता दाखविण्यात टाळाटाळ करणाऱ्या ममतांशी असणारे राजकीय सलोख्याचे संबंध तोडण्याचा निर्णय का घेतला नाही? हेच भाजपबाबतही लागू होते. हे प्रज्वल प्रकरण उघडकीस आणले ते भाजपच्याच देवराजे गौडा यांनी. या प्रकरणाबाबत आपण पक्षातील वरिष्ठांना पूर्वकल्पना दिल्याचा या गौडांचा दावा आहे. मात्र, जवळपास वर्षभर या गौडा महाशयांनी या प्रकरणावर मौनच बाळगले होते. मात्र, प्रज्वल ज्या हसन मतदारसंघातून निवडणूक लढवत होता त्या मतदारसंघाच्या मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजे २५ एप्रिलला अश्लील चित्रफितींचे हजारो पेनड्राईव्ह हसन मतदारसंघात अत्यंत पद्धतशीरपणे हातोहात पसरवले गेले. हे प्रकरण मुळात ज्याच्यामुळे बाहेर आले तो प्रज्वलचा खासगी वाहनचालक होता. वर्षभरापूर्वी त्याचे व प्रज्वलचे फाटल्याने तो प्रज्वलला सोडून गेला. त्यानेच ही माहिती भाजपच्या गौडा यांना चित्रफितींच्या पुराव्यांसह पुरवली. तिचा वापर न करण्याचे वचन गौडा यांनी मला दिले होते. मात्र, त्यांनी ते मोडले, असा या वाहनचालकाचा दावा आहे. म्हणजेच जवळपास वर्षभरापूर्वीच या प्रकरणाचे बिंग फुटले होते मात्र, सर्वच राजकीय पक्षांनी त्यावर सोयीस्कर मौन बाळगले होते किंवा ते जाहीर करण्यासाठी योग्य संधीची प्रतीक्षा केली जात होती, असेच मानण्यास वाव आहे. निवडणुकीची संधी साधून राजकीय हिशेब चुकता करण्यात येत असल्याचा आरोप यातूनच होतोय व शेकडो महिलांच्या लैंगिक शोषणाचा हा मुद्दा राजकारणासाठी वापरला जातोय. जून २०२३ मध्ये रेवण्णा आणि पुत्र प्रज्वल यांना आपल्याबाबत लैंगिक शोषणाचे व्हीडीओ व्हायरल होण्याची कुणकुण लागली होती. त्यामुळे त्यांनी न्यायालयात धाव घेऊन विविध ८६ प्रसारमाध्यमे आणि प्रज्वलचा वाहनचालक कार्तिकसह तिघांना कोणताही व्हीडीओ व्हायरल करू नये यासाठीचा मनाईहुकूम मिळवला होता. याचा अर्थ आता प्रज्वलवर निलंबनाची तोंडदेखली कारवाई करणाऱ्या जेडीएसच्या कुमारस्वामी यांना व मागच्या वर्षभरापासून कर्नाटकमध्ये सत्तेवर असणाऱ्या काँग्रेस सरकारला या प्रकरणाची माहिती होतीच. मात्र, प्रत्यक्ष व्हीडीओ व्हायरल होईपर्यंत भाजप, जेडीएस यांच्याबरोबर काँग्रेसनेही या प्रकरणावर सोयीस्कर मौनाचीच भूमिका घेतली असल्याचे दिसते. आता मात्र हे तिन्ही पक्ष एकमेकांवर चिखलफेक करताहेत व एकमेकांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न करीत आहेत. हे वादळ उठले असतानाच पश्चिम बंगालचे राज्यपाल सी. व्ही. आनंद बोस यांच्याविरोधात महिला कर्मचाऱ्याने विनयभंगाची तक्रार दिली आहे. या सर्व घटनांमध्ये स्त्रीत्वाचा अपमान होतो आहे याचे भान कुठल्याही राजकीय पक्षास असल्याचे दिसून येत नाही. जे दुर्दैवाचे आहे.

# मुंडे- धस कुटुंबावरील प्रेम मतदानातून दिसून येईल-आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब,त्यांच्या सुकन्या पंकजाताई मुंडे आणि सुरेश धस यांच्यावर प्रेम करणारी असंख्य जनता आष्टी विधानसभा मतदारसंघात असून अनेक निवडणुकांमध्ये त्याचा प्रत्यय आलेला आहे केवळ राजकीय विचार न करता सतत जनतेमध्ये मिळून मिसळून सुखदुःखात सहभागी होणे या विशेष बाबींमुळे या मतदारसंघात या दोन आडनावांची मोठ्या प्रमाणावर ताकद आहे आणि वेळोवेळी ही ताकद या मतदारसंघात दिसली आहे.त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या मतदानात देखील या दोन्ही आडनावांची ताकद दिसून येणार आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आहे आष्टी येथील प्रमुख कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते ते म्हणाले.

यावेळी व्यासपीठावर माजी जि. प.अध्यक्ष अबुशेठ सय्यद,शिरूर कासार नगराध्यक्ष रोहिदास गाडेकर,नगराध्यक्ष राजू जाधव,मधुकर गर्जे,गोपाळ भाऊ रक्ताटे, सभापती किरण शिंदे,अरुण भैय्या निकाळजे,सादिक कुरेशी,कल्याण पोकळे, रमेश ढगे, दतोबा वाडेकर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना आ.धस म्हणाले,या लोकसभा निवडणुकीमध्ये मराठा आरक्षणाबाबत काही अपप्रवृत्ती समाजामध्ये राजकीय दृष्टिकोनातून फायदा घेण्यासाठी गैरसमज पसरवत आहे आता हा गैरसमज अकारण असून यातील वस्तुनिष्ठता सर्वांचे लक्षात आलेली आहे प्रत्यक्षात गावोगावी प्रत्यक्ष जनतेत जाऊन याबाबतची पाहणी करत असताना चर्चा करत परिस्थिती वेगळी असलेली दिसून येत आहे.. ज्या गावातील बहुसंख्या जनता हे आपणाला मानणारी आपल्या नेतृत्वावर विश्वास ठेवणारी आहे त्या ठिकाणी प्रत्यक्ष गावोगावी वाड्यात वस्त्यांवर आपण परिस्थितीची पाहणी केली आहे भारतीय जनता पार्टी आणि मराठा आरक्षणाबाबत मतदाराच्या आणि सर्व सामान्य कार्यकर्त्याच्या कोणाच्याही काही डोक्यामध्ये नाही मात्र नाहक विरोधकांकडून जे अफवांचे पीक पसरवलं जातंय ते साफ चुकीचं आहे. ही लोकसभेची निवडणूक ज्या पद्धतीची चाललेली आहे ते पाहता आपल्या राजकीय कारकिर्दीतील ही पाहिलीच निवडणूक माझी नाहीये यापूर्वी मी १९९७ पासून राजकारण करत आलोय अनेक निवडणुका लढवल्या आहेत.प्रत्येक वेळेस



काही ना काही या जिल्ह्याच्या राजकारणात घडत जातं आणि त्याचा नको तेवढं विषय वाढवला जातो.म्हणून गावागावांतील प्रमुख कार्यकर्त्यांनी आता आपले गाव मतदान होईपर्यंत सोडायचे नाही शिवाय मतदारांच्या घरोघरी जा जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने गेल्या दहा वर्षातील केलेल्या उल्लेखनीय कार्याचा त्यांनी राबवलेल्या विविध योजनांची माहिती पुस्तिका त्यांच्या हातात द्या.आणि पंकजा ताईंना मतदान करण्याचे आवाहन मतदारांना करा असे सांगत प्रमुख कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना उद्देशून ते म्हणाले की,

आज आम्ही जात्यात आहोत पण तुम्ही सुद्धा सुपात आहात.तुम्हालाही जात्यात यावं लागेल असे जर झाले.तर तुम्ही समजून घ्या एकदा भोंगळे सहकारी संस्था पार्टी जर झाली तर हे कायमस्वरूपी भोंगळे सहकारी संस्था होऊन जाईल असे होऊ द्यायचे नसेल तर प्रामाणिक पणे कामाला लागा. कोविड सारख्या भयंकर साथीच्या रोगांमध्ये जनता भयभीत झालेली असताना आपण रस्त्यावर उतरून २४ तास जनतेच्या सेवेत राहिलो आहे. विविध कारखान्यांवरून परत येत असताना अनेक गावांमध्ये ऊसतोड मजुरांना अडविल्या नंतर त्यांना सोडविण्यासाठी देखील आपण रात्री अपरात्री घराबाहेर पडलो होतो.त्या वेळेस जो कोणी अडचणीत असेल त्याला अहोरात्र मदत करण्याचे काम मी केलेले आहे.त्याचा परिणाम म्हणून माझ्यावर गुन्हे दाखल झाले.तरीही मी मागे वळून न जाता इतर पुढार्यांसारखा षंढ म्हणून घरात बसलो नाही कायम जनतेची सेवाच करत राहिलो. १२ महिने १८ काळ माझं कुटुंब, माझ्या कुटुंबातील सर्व माणसे ही लोकांच्या सुखात आणि दुःखात नेहमी सहभागी आहेत याची कुठेतरी आपण जाण ठेवा.अरे तुमच्या अण्णाला सहकार्य करायला माझ्या स्वतःच्या निवडणुकीमध्ये पंकजाताई स्वतः ग्राम विकास मंत्री असताना त्या माऊलीने २५ दिवस स्वतःचं कार्यालय आणि सगळी कामं बाजूला ठेऊन फक्त सुरेश धस साठी त्या तीन जिल्ह्यामध्ये सगळीकडे फिरत होत्या. आता ह्या वेळेस आपल्याला त्यांच्यासाठी दारोदारी जायचं आहे.लोकांना सांगायचं ज्यांनी सत्तेच्या काळात समाजाला आरक्षण देण्याचे काम करणे गरजेचे होते.. महाविकास आघाडीचे विश्व प्रवक्ते संजय राऊत यांनी अतिशय शिस्तबद्ध आणि शांततेच्या वातावरणात काढलेल्या मराठा आरक्षणाच्या मूक मोर्चाला मुका मोर्चा असे संबोधले होते आणि समाजाला हिणवले होते हे कसे विसरता येईल असा सवाल करत ते म्हणाले ज्यांनी समाजाला मिळणारे आरक्षण स्वतः मुख्यमंत्री असताना समाजाला आरक्षण कसे मिळणार नाही याची तंतोतंत काळजी घेतली अशा लोकांच्या पाठीशी आपले काही लोक जात आहेत.त्यांनी थोडा अभ्यास करणे गरजेचे असल्याचे मत आ.धस यांनी व्यक्त केले. या बैठकीस विस्तारक हरिष खाडे, देविदास धस,जयदत्त धस,श्याम धस, दत्ता काकडे,अमर निंबाळकर,माऊली जरांगे,प्रकाश कवठेकर,महेंद्र गर्जे,बद्रीनाथ जगताप, सभापती रमजान तांबोळी,गणेश शिंदे,जिया बेग,संजय आजबे,भाऊसाहेब भवर,रंगनाथ धोंडे,सुरेश उगलमुगले,रामहरी महारनोर,भागवत येवले,गणेश भांडेकर,अंकुश चव्हाण,अजित घुले,चेअरमन शांतीलाल भोसले,परिवंत गायकवाड,अशोक इथापे,खंडू जाधव,अशोक गर्जे,अशोक पवार,छत्रगुण मरकड,आत्माराम फुंदे,शरद भगत,जयशिंग गव्हाणे,प्रकाश देसरडा,नवनाथ नागरगोजे, बन्सीभाऊ पोकळे,अशोक सुपेकर,राहुल सुरवसे,संजय ढोबळे,बाळासाहेब बोराडे,यांच्यासह बूथप्रमुख, प्रवासी कार्यकर्ता, शक्ती केंद्रप्रमुख, वॉरियर्स, सुपर वॉरियर्स, विस्तारक, गणप्रमुख, गटप्रमुख,प्रमुख पदाधिकारी यांच्यासह असंख्य कार्यकर्ते या नियोजन बैठकीत उपस्थित होते.

# चाकणकर यांनी केली ईव्हीएम मशिनची पूजा; गुन्हा दाखल

**बारामती। प्रतिनिधी**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी ईव्हीएम मशिनची पूजा केल्याने नवीन वाद ओढावून घेतला आहे. निवडणूक अधिकाऱ्यानेच त्यांच्याविरोधात तक्रार दिली. त्यानंतर त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यावर हे प्रकरण शेकण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघ देशाच्या नकाशावर आला आहे. या मतदारसंघात मंगळवार सकाळपासून मोठमोठ्या घडामोडी घडल्या. अजित पवार यांचा 'मेरे पास माँ है' हा डायलॉग गाजला. तर सुप्रिया सुळे थेट अजित पवारांच्या घरी गेल्या. राजकीय वातावरण अशा प्रकारे ढवळून निघत असतानाच आता अजून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे राज्यासह देशात खळबळ उडाली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी ईव्हीएम मशिनची पूजा केल्याने नवीन वाद ओढावून घेतला आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर या खडकवासला परिसरातील एका मतदान केंद्रावर पोहोचल्या. मतदान सुरू होण्यापूर्वी त्या औक्षण करण्याचे ताट घेऊन मतदान केंद्रात दाखल झाल्या. त्यांनी ताटात दिवा पण ठेवलेला होता.

# धाराशिवमध्ये मतदान केंद्राजवळच एकाची हत्या

**धाराशिव । प्रतिनिधी**

राज्याच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदानाला गालबोट लागले असून धाराशिवमध्ये मतदान केंद्राजवळच झालेल्या चाकू हल्ल्यात एकाचा मृत्यू झाला आहे. धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील पाटसांगवी या ठिकाणी ही हत्येची घटना घडली. राजकीय वादातून ही हत्या झाल्याची माहिती समोर आली आहे. दोन गटांतील वादाचे रूपांतर चाकू हल्ल्यात झाले आणि त्यात एकाचा मृत्यू झाला. या हल्ल्यात इतर तीन जण गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

भूम तालुक्यातील पाटसांगवी गावातील जिल्हा परिषदेच्या मतदान केंद्राच्या परिसरात हा वाद झाला. मतदान केंद्रावर मतदान आणण्यावरून हा वाद झाला आणि त्यानंतर त्याचे पर्यावसन मोठ्या भांडणात झाले. त्यातून एका गटाने दुसऱ्या गटावर चाकू हल्ला केला. समाधान पाटील असे मृत तरुणाचे नाव आहे. तर ज्याने चाकू हल्ला केला त्या आरोपीचे नाव गौरव अप्पा नाईकनवरे असे आहे. चाकू हल्ला करणारा हल्लेखोर फरार असून त्याचा शोध पोलिस घेत आहेत. तर या हल्ल्यात इतर तीन जण जखमी झाले आहेत त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. गेल्या काही दिवसांपासून दोन गटांमधील वाद चांगलाच धुमसत होता. मंगळवारी मतदानाच्या दिवशी त्याचे निमित्त झाले आणि त्यातून ही हत्या झाली.

# पान १वरून...

## केजरीवाल यांना काही अटीवर जामीन

अशा सवलतीला विरोध करताना, अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) म्हटले की त्यातून सामान्य माणसाला ''चुकीचा संदेश'' जाईल आणि त्यानुसार केवळ राजकारण्यांसाठी कोणताही अपवाद न ठेवण्यासाठी न्यायालयाला प्रोत्साहित केले. एजन्सीने असेही स्पष्टपमे नमूद केले. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी दिल्ली उत्पादन शुल्क धोरण प्रकरणात नऊ पूर्वीचे समन्स टाळले होते. जामिनाच्या सुनावणीच्या एक दिवस आधी दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही.के. सक्सेना यांनी राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे (एनआयए) सुप्रिमोच्या चौकशीची शिफारस केली. ही शिफारस जागतिक हिंदू फेडरेशन इंडिया ने केलेल्या तक्रारीवर आधारित आहे ज्यामध्ये राजकीय पक्षाला बंदी घातलेल्या 'सिख्स फॉर जस्टिस' या संघटनेकडून राजकीय निधी मिळाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

---------

## सोळा मे पुर्वी कापूस बियाण

शेंदरी बोंड अळीचा जीवनक्रमास पोषक वातावरण निर्माण होऊ शकते. ज्यातून या अळीचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेत यंदा शेंदरी बोंड अळीच्या प्रादुर्भावास आळा घालण्याकरिता हंगाम पूर्व कापसाची लागवड करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार, कापूस बियाणे पुरवठा करण्यासाठी पुढीलप्रमाणे निर्देशित करण्यात आले आहे. यात प्रामुख्याने कापूस बियाणे उत्पादक कंपनी ते आपले उत्पादित बियाणे १ ते १० मे २०२४ या कालावधीत वितरित करू शकणार आहे. त्यानंतर वितरक हा १० मे २०२४ नंतर किरकोळ विक्रेत्यांना हे बियाणे देऊ शकणार आहे. तर १५ मे २०२४ नंतरच किरकोळ विक्रेते हे शेतकऱ्यांना कापूस बियाणे विक्री करू शकणार आहे. तसेच शेतकऱ्यांना देखील १ जूननंतरच प्रत्यक्ष कापूस लागवड करता येणार आहे. असेही कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

-----------

## गोपीनाथजी मुंडे यांचं स्वप्न पूर्ण करण्याची

चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे, खासदार प्रीतमताई मुंडे जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे आदींसह जिल्ह्यातील सर्व आमदार, माजी आमदार, भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं, रासप, मनसेचे जिल्हाध्यक्ष उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच परळी वैद्यनाथ, योगेश्वरी देवी संत भगवान बाबा संत नारायण महाराज यांना नमन करत असल्याचे सांगत बीडच्या आमचे दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांनाही नमन करतो असे सांगत नरेंद्र मोदी यांनी देऊन घेत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत माझे हृदयाचे नाते होते, बीड जिल्ह्यासह मराठवाड्याच्या विकासासाठी ते माझ्याशी चर्चा करत. आज मला इथे आल्यानंतर त्यांची खूप आठवण येत आहे. माझे दुर्भाग्य हे राहिले की २०१४ मध्ये तुम्ही मला देशसेवेची पहिल्यांदा संधी दिली तेव्हा मी दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांना बीडमधून निवडून आल्यानंतर दिल्लीला माझ्यासोबत केंद्रात मंत्रीपदी विराजमान केले होते. गोपीनाथ मुंडे यांच्याकडे माझ्यापेक्षा जास्त राजकारणाचा अनुभव होता, मात्र त्यांना आपल्याला गमवावे लागले. त्यांच्यासह अरुण जेटली, सुषमा स्वराज, मनोहर पर्रीकर हे जवळचे सहकारी आपल्याला गमवावे लागले. ते नसल्याने त्यांची सतत कमतरता जाणवते अशी खंतही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी व्यक्त केली.

**आशीर्वाद घेण्यासाठी आलोय**

विकसित भारताच्या मिशनवर मोदी काम करत असून या संकल्पसह तुमचे आशीर्वाद घेण्यासाठी आज मी इथे आलो आहे. तुमच्या भविष्याला अधिक चांगले बनवण्यासाठी मी रात्रंदिवस काम करत आहे. तुम्ही सर्वजण माझा परिवार आहात. हक्काचे आरक्षण अडचणीत आले, असाच प्रयोग काँग्रेस सत्तेत आल्यावर देशभरात करू इच्छिते. परंतु मोदी जिवंत असेपर्यंत दलित, आदिवासी, ओबीसी आणि वंचितांचे आरक्षण कोणालाही हिसकावून घेऊ देणार नाही. महाराष्ट्रात काँग्रेस सोबत नकली शिवसेना आणि नकली राष्ट्रवादी काँग्रेस आहे तर आमच्या सोबत खरी राष्ट्रवादी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस आहे असे सांगत पंतप्रधान मोदी म्हणाले, स्वतःही काही करायचे नाही आणि इतरांनाही काही काम करू द्यायचे नाही हेच काँग्रेसचे आजपर्यंतचे धोरण राहिलेले आहे. मी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन सुरू करण्याचा निर्णय घेतला तेव्हा काँग्रेसने त्याची चेष्टा केली, नंतर विरोध केला नंतर मात्र आम्ही हे काम वेगाने सुरू केले, तेव्हा त्यामध्ये आडवे येण्याचा प्रयत्न त्यांनी केला. हे लोक सत्तेमध्ये आल्यानंतर कोणतेच काम होऊ देणार नाहीत त्यामुळे यांना बाजूला ठेवा एकविसाव्या शतकातील देश विकासासाठी भाजप एनडीए सरकारला प्रचंड बहुमताने विजयी करा. काँग्रेस जिथेही सत्तेत आली तेथे त्यांनी नुकसानच केले. महाराष्ट्र आणि मराठवाडा याचे अनुभव घेत आहे असे सांगत नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर टीका केली.

**मराठवाड्याच्या विकासाची जबाबदारी ' बेटी पंकजा' वर**

महाराष्ट्रात आता आमचे सरकार योग्य पद्धतीने काम करत असून या सरकारने सिंचन योजना वेगाने पुढे नेली आहे. राज्यात आम्ही सिंचनाचे २७ प्रकल्प निवडले, त्यातील १० प्रकल्प आता पूर्णही झाले असून तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बळीराजा जलसंजीवनी योजना सुरू केली. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मात्र ती योजना रोखली होती, मात्र आता आम्ही पुन्हा ती योजना राज्यात सुरू केली आहे. मराठवाडा खर्या अर्थाने दुष्काळमुक्त करण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला आहे. मी गरिबीतून येऊन तुमच्या आशीर्वादाने पंतप्रधान पदापर्यंत पोहोचलो शेतकर्यांचे दुःख मी जाणता, म्हणूनच शेतकर्यांना पिक विमा देण्याची गॅरंटी आम्ही दिली. दरवर्षी बीड जिल्ह्याला ५०० ते ७०० कोटी रुपयांचा विमा मिळतो. महाराष्ट्र सरकार शेतकरी सन्मान निधीतून दरवर्षी शेतकर्यांना सहा हजार रुपये देत आहे, मराठवाड्याचा विकास करणे ही भाजप एनडीए जबाबदारी समजतो, म्हणूनच आम्ही या भागात राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्गांचे जाळे विणले. सुरत -अक्कलकोट, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर या महामार्गासह नगर-बीड-परळी रेल्वे मार्ग निर्माणाचे काम वेगाने सुरू आहे. ही सर्व कामे समोर ठेवून दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी मी बेटी पंकजा मुंडे यांच्यावर दिली आहे असे ते म्हणाले.

**बेटी पंकजाला प्रचंड बहुमताने विजयी करा**

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंकजाताई मुंडे यांचा भाषणाच्या सुरुवातीलाच बेटी पंकजा असा उल्लेख केला. येत्या १३ तारखेला पंकजाताई मुंडे यांना मागील सर्व रेकॉर्ड मोडीत काढून तुम्ही सर्वजण प्रचंड मताधिक्याने निवडून देत संसदेत पाठवा असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.

---------

## मराठा समाजाच्या आरक्षणावर सरकार

पिपाणी झाल्याचे दिसले पाहिजे एवढं मताधिक्य पंकजाताईंना द्या असे आवाहन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. दरम्यान मराठा आरक्षणावर सरकार सकारात्मक असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. बोला परळी वैजनाथ महाराज की जय अशा उद्घोषनेने आपल्या भाषणाची सुरुवात करून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी सांगितले की, राज्यातलं तापमान सध्या ४० च्या पुढे गेलंय आणि चार तारखेला महाराष्ट्राचा पारा ४५ पार होईल आणि देशातला ४०० पार होणार आहे. महायुतीच्या या तळपत्या विजयामध्ये विरोधकांची लंका खाक झाल्याशिवाय राहणार नाही. बीड जिल्ह्यात काय होणार ? याची चिंताच नाही. पंकजाताईंचा विक्रमी विजय केल्याशिवाय स्वस्थ बसायचं नाही हा संकल्प करा. बीडमधून तुतारीची पिपाणी करा. विकासाची कास धरा.कारण देशांमध्ये एकच गॅरंटी चालते ती म्हणजे मोदी गॅरंटीआणि आता देशातल्या लोकांनी गॅरंटी घेतली आहे की फिर एक बार मोदी सरकार आणण्याची. त्यामुळे पंकजाताईंची साथ सोडू नका असे आवाहन त्यांनी केले. पंतप्रधान मोदींना उद्देशुन मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आमच्या बीडची जनता निर्मळ मनाची आहे.मनात काहीही खोट नाही.ज्याला स्विकारलं त्याची साथ कधीही सोडत नाही.बीडच्या जनतेने आमचे मुंडेंना सदैव प्रेम दिलं त्यांचा सदैव सन्मान केला.आज तेच प्रेम व साथ पंकजाताईंना ही जनता देत आहे. त्यामुळे पंकजाताईना विजयी करुन विकासाला ही जनता नक्कीच साथ देणार असा विश्वास असल्याचे त्यांनी सांगितले. पंकजाताईंना मत म्हणजे मोदीजींना मत मोदीजींना मत म्हणजे देशाच्या विकासाला मत आहे.ही निवडणूक पंकजाताईंची किंवा तुमची आमची नाहीये ही निवडणूक देश व महाराष्ट्र घडवणारी आहे. ही निवडणूक महासत्ता घडवणारी आहे. ही निवडणूक नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी आहे.म्हणून येत्या १३ तारखेला आपण सगळ्यांनी मिळून पंकजाताईंना प्रचंड मताधिक्याने विजयी करायचं आहे असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

**मराठा समाजाने कोणत्याही भुलथापांना बळी पडू नये**

यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाज बांधवांना खास करून आवाहन केले त्यांनी सांगितले की, काही लोक मराठा समाजामध्ये संभ्रम पसरवतात पण आपल्या सरकारने मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण दिले आहे. कोणत्याही समाजाला धक्का न लावता ते कोर्टात टिकवले. ज्यांनी द्यायला पाहिजे होतं त्यांनी दिलं नाही परंतु आपण दिल्यानंतर ते कोर्टात जातात. परंतु आपलं सरकार मराठा समाजाला दिलेलं आरक्षण टिकवणार. कायद्याच्या चौकटीत बसवणार आणि कुणबी प्रमाणपत्र देण्याचं पण काम सुरू केलं.सगेसोयरेचं पण सुरु आहे.ओबीसी समाज व इतर कुठल्याही समाजावर अन्याय न करता आम्ही मराठा समाजाला न्याय दिला आहे. म्हणून तुम्ही कुणाच्याही भूलथापांना बळी पडू नका. तुम्ही कुठेही दिशाभूल करणाऱ्याला बळी पडू नका. अठरापगड जाती धर्माच्या विकासाची गॅरंटी घेणाऱ्या, वंचित उपेक्षित घटकांसाठी सातत्याने काम करणाऱ्या पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी खंबीर उभे राहून बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना लोकसभेत विक्रमी मताधिकाने विजयी करा असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले.

---------

## देशाचं संविधान कोणी बदलू

गोपीनाथ मुंडेंचे मोठे योगदान होते. त्यामुळे प्रमोद महाजन व गोपीनाथ मुंडेंचा नामांतरात होता मोठा वाटा,१३ तारखेला महाविकास आघाडीचा काढा काटा, गोपीनाथ मुंडेंची आठवण ठेवत पंकजाताईंना विजयी करा.निवडणूकीची तारीख आहे तेरा आणि तुतारीचे वाजवा बारा,द्या भारत माता की जय चा नारा. मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला आमचा पाठिंबा आहे. पंकजाताईंचाही पाठिंबा आहे.त्यामुळे पंकजाताई सारख्या अनुभवी, अभ्यासू व तळमळीने काम करणाऱ्या नेत्याला संसदेत पाठवा. महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणेंवर घाणाघाती टिका करत रामदास आठवले यांनी आपल्या खास शैलीत निशाणा साधला. मुख्यमंत्री साहेब तुम्ही चंदनतस्कराला शोधा आणि बीड जिल्ह्यातील लोकहो तुम्ही त्याला १३ तारखेला गाडा अशा शब्दात ना.रामदास आठवले यांनी टिका केली.

-----------

## मतदारांनो,जातीय सलोख्याची तस्करी

भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले. कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अलोट जनसागराच्या साक्षीने विराट जाहीर सभा झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. पंकजाताई मुंडे म्हणाल्या, मी विकास केला आहे हे जनता मान्य करते. ही निवडणूक विकासासाठी आहे, राज्याला आणि जिल्ह्याला एकच सरकार हवे आहे.. देशासाठी काम करायची संधी आहे. पक्षाचा आदेश मानणारे आम्ही आहेत. विकासाबरोबर तरुणाचे भान हरपलं नाही पाहिजे यासाठी आपल्याला काम करायचे आहे. , जो वंचित, उपेक्षित आहे, ज्याचा कोणी वाली नाही त्याची सेवा करण्यासाठी माझ्या पित्याने मला राजकारणात आणलं असल्याचे त्या म्हणाल्या.

**तुम्हीच माझे मुंडे साहेब, तुम्हीच माझी उर्जा**

मला पाच वर्षे मुंडे साहेबांनी मागितले होते मात्र त्यापुर्वीच त्यांचे निधन झाले. आता तुम्हीच सर्वजण माझे मुंडे साहेब आहात. तुम्हीच माझी उर्जा आहात.असे सांगत तुम्हीच माझी या निवडणुकीत काळजी घ्या. तुमच्या सेवेसाठी मी काम करणार आहे. या निवडणूकीसाठी बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख, तुम्ही आता निर्धाराने काम करा. आपला विजयाचा निकाल आता कोणीही बदलू शकत नाही. मला जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करायचा आहे. बीड जिल्ह्यातील जमीन ओलिताखाली आणायची आहे. शेतकरी ऊस तोड कामगारांचे जोवन उंचावण्यासाठी काम करायचं आहे, मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली मला हे काम आगामी पाच वर्षात करायचे आहे. जिल्ह्यातील १० हजार तरुणांना जिल्ह्यात रोजगार उपलब्ध करून घ्यायचा आहे. जिल्ह्यात कॅन्सर रुग्णालय उभारायचे आहे. मुस्लिम समाज बांधवांनी विरोधकांच्या भूलथापांना बळी पडू नये. त्यामुळे थकायचे आणि रुकायचे नाही विकासासाठी काम करत रहायचे असे सांगत पंकजाताई मुंडे यांनी आता निर्धाराने कामाला लागा, अधिकाधिक मतदान मिळवा, जिल्ह्याच्या विकासासाठी मला प्रचंड मतांनी विजयी करून संसदेत पाठवा असे आवाहन पंकजा मुंडे यांनी केले.

**कोशिश करनेवालोंकी हार नही होती...**

यावेळी पंकजाताईंनी आपल्या भाषणात म्हटलेली कविता खूप काही सांगून गेली.डुबकिया सिंधू में गोताखोर लगाता है, जा जा कर खाली हाथ लौटकर आता है। मिलते नही सहज ही मोती गहरे पाणी में, मुठ्ठी उसकी खाली हर बार नही आती, कोशिश करनेवालोंकी कभी हार नही होती। या कवितेच्या ओळीने टाळ्यांचा एकच कडकडाट झाला.

-----------

## मोदींजींची सभा विजयाचा

आहे. त्यासाठी मोदींजींची विकासाची गॅरंटी पंकजाताई जिल्ह्यासाठी पूर्ण करू शकते, असा विश्वास कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज अंबाजोगाई येथे आयोजित विजयी संकल्प सभेत धनंजय मुंडे बोलत होते. सभेला उपस्थित विराट जनसमुदाय पाहून ही सभा विजयाचा संकल्प करणारी नाही तर पंकजाताईच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी आहे, असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. बीड जिल्ह्याच्या नावापुढे लागलेला मागासलेपणाचा कलंक पुसून काढण्यासाठी जिल्ह्यातील शेती जलयुक्त करणे, उस तोडणाऱ्या हातांना ऊस उत्पादक बनवणे, इथल्या लोकांना इथेच रोजगार मिळवून देणे, हे आमचे ध्येय असून, यासाठी पंकजाताईला संसदेत पाठवणे आवश्यक आहे, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले. दरम्यान बीड जिल्ह्यात रस्ते व रेल्वेचे काम वेगाने सुरू असून, अंबाजोगाईला देखील घाटनांदूर वरून रेल्वेला जोडण्याची आमची अनेक वर्षांची मागणी सुद्धा आगामी काळात पंकजाताई या मोदींजींच्या नेतृत्वात पूर्ण करतील, अशी अपेक्षाही धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

----------

## बीडमध्ये आज अतिभव्य उर्दू

या संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जहाँगिर एज्युकेशनल, सोशल अ‍ॅण्ड वेल्फेअर फाऊंडेशनचे अध्यक्ष सलीम जहाँगीर यांनी केले आहे.

--------------

cmyk



# माजलगाव तालुक्यातील कर्मचाऱ्यांनी ईडीसी कर्तव्य प्रमाणपत्र प्राप्त करावे

बीड :- माजलगाव विधानसभा मतदारसंघातील कार्यरत माजलगाव तालुक्यातील अधिकारी, कर्मचारी यांनी त्यांचे निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, गौरव इंगोले यांनी कळविले आहे. माजलगाव विधानसभा मतदार संघातील धारूर, वडवणी या तालुक्यातील ज्यांचे प्रथम प्रशिक्षण झालेले आहे त्यांनी निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले आहे. याप्रमाणे उद्या बुधवार दिनांक ८ मे २०२४ रोजी समाज कल्याण मुलींचे वस्तीगृह, केसापूर वसाहत, माजलगाव या ठिकाणाहून सर्व माजलगाव तालुक्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांचे ईडीसी प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी गौरव इंगोले यांनी कळविले आहे.

# ध्यान हे मनाला निरोगी बनविण्यासाठीचे प्रभावी माध्यम - प्रा.विनय सोनुळे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सुन्यती इंटरनॅशनल फाउंडेशन व आई सेंटर प्रो तर्फे आयोजित दोन दिवसीय शिबिरास अंबाजोगाईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आजच्या या धकाधकीच्या व ताणतणावपूर्ण जीवनात, दैनंदिन कामकाजात सर्वच जण इतके मग्न झाले आहेत. की, त्यांना स्वतःच्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी वेळच नाही. काही जण शरीर निरोगी राहण्यासाठी व्यायाम करतात पण, आपले मन निरोगी राखण्यासाठी काय करावे हे बहुतांशी जणांना माहिती नसल्यामुळे किंवा कळतय पण वळत नाही या उक्तीप्रमाणे मानव हा दैनंदिन जीवनात नैराश्य, उदासीनता, अपयश, उद्विग्नता, व्यसनाधीनता व ताण-तणावास सामोरे जावे लागत आहे. यावर उपाय म्हणजेच नियमित ध्यान करणे आवश्यक असून केवळ ध्यान हे मनाला निरोगी बनवण्यासाठी चे प्रभावी माध्यम असल्याचे प्रतिपादन सुन्यती इंटरनॅशनल फाउंडेशनचे केंद्रीय समन्वयक तथा मानसशास्त्रज्ज्ञ प्रा. विनय सोनुळे यांनी केले.

येथील प्रशिक्षण क्षेत्रात अग्रगण्य असलेले विद्यार्थी-पालक, तसेच नोकरदार व व्यावसायिकांसाठी स्पोकन इंग्लिश व व्यक्तिमत्व विकासाबरोबरच, करिअर गाईडन्स, नोकरी विषयक मेळावे तथा व्यवसाय मार्गदर्शन शिबिरांचे सुनियोजन करणारे व समाजभानातून सर्वांना यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली देणारे विश्वविक्रमवीर प्रशिक्षक तथा सुप्रसिद्ध लेखक नागेश जोंधळे संचालक, आई सेंटर प्रो, आई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व इंग्लिश विंग्ज प्रि-प्रायमरी स्कूल यांच्या पुढाकाराने सुन्यती रिट्रीट म्हणजेच सुन्याती समता विपष्यना शिबिर - मराठवाडा चाप्टर-१ मनोहर अंबानगरीत आयोजित करण्यात आले होते. पुढे बोलताना प्रा.विनय सोनुळे यांनी या दोन दिवसीय शिबिरात सुन्य मेडिटेशन काय आहे व ते कसे करायचे त्याचबरोबर त्याचे फायदे दैनंदिन जीवनात कसे अनुभवता येता येतील यासाठीचे सखोल मार्गदर्शन विविध प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून



या शिबिरात सहभागी झालेल्या लहानांपासून मोठ्यापर्यंत जगातील सर्वांत कठीण काम व ते ही अगदी सोप्या पद्धतीने कसे करायचे याचे प्रशिक्षण प्रा.सोनुळे यांनी अतिशय प्रभावीपणे दिले. या शिबिरात मनाचे डॉक्टर म्हणून सुपरिचित असलेले सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनीही सर्वांसोबत पूर्ण वेळ सहभागी होत सुन्य ध्यानाचे नवीन कौशल्य हस्तगत केले. आपल्या मनोगतात उपस्थितांना संबोधित करताना डॉ.इंगोले यांनी शरीर जसे आजारी पडते तसेच मनही आजारी पडत असते. त्यामुळे मनाच्या आरोग्याची ही काळजी घेणे आजच्या जीवनशैलीत अत्यावश्यक आहे.

विविध प्रकारचे मानसिक आजार जसे अस्वस्थता, ओसी डी, व्यसनाधीनता यामध्ये या सुन्यती मेडिटेशन तंत्राचा वापर करून या आजारांवर मानसिक नियंत्रण मिळण्यास मदत होईल असे प्रतिपादन डॉ.इंगोले यांनी केले. सुन्यती समता मेडिटेशन मध्ये श्वासाचा उपयोग करून मनावर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. याद्वारे मनावर संस्कार घडवून मन योग्य रितीने नियंत्रणात आणण्यासाठी मदत होते. आपल्या वैद्यकीय क्षेत्रातील प्रॅक्टिसच्या स्वानुभावातून ध्यान हे अतिशय अमूल्य अशी देणगी असून मानवी कल्याणासाठी त्याचा सदुपयोग होणे व तो आपण करून घेणे गरजेचे असल्याचे सांगितले तसेच सर्वांना ध्यान साधना करण्यासाठी लवकरच सुसज्ज असा हॉल लवकरच अंबाजोगाईकरांच्या सेवेत उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. प्राचार्या सुवर्णा कुलकर्णी यांनी मनोगतात आपल्या शैक्षणिक संस्था चालवत असताना वैयक्तिक व व्यावसायिक जीवनात प्रचंड ताण-तणावास त्यांना सामोरे जाऊन आपली जबाबदारी पार पाडणे तारेवरची कसरत असल्यामुळे या शून्य समता विपश्यना शिबिराचा खूप फायदा असुन नियमित त्याचा सराव करण्याचा निर्धार सर्वांसमोर केला. योगगुरू अरूण शिंदे यांनी मी याआधीही ध्यानसाधना केली आहे. परंतु, सुन्यती मेडिटेशन आजवर केलेल्या सर्व ध्यानसाधनेत सहज सोपे व प्रभावशाली वाटले असे मत व्यक्त केले. या शिबिरात मराठवाड्यातील विविध भागातून आलेले तरूण-तरूणींनी तसेच सजग महिला व पुरूष यामध्ये डॉक्टर, इंजिनीअर, ऍडव्होकेट, पोलीस अधिकारी, शिक्षक - प्राध्यापक, संस्थाचालक, व्यावसायिक व विद्यार्थी अशी विविध क्षेत्रातील मान्यवर उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी सुन्यती इंटरनॅशनल फाऊंडेशनचे करण जगदंबे व नरेंद्र बोरकर यांच्या समवेत आई सेंटर प्रो चे कॉर्पोरेट मॅनेजर संदीप अंबेसंगे, अल्पा पांडे, प्राचार्या सुवर्णा कुलकर्णी, तरूण उद्योजक सचिन थोरात, अरूण शिंदे, अविनाश निर्मळ, समीर सय्यद, प्रतीक गौतम व सर्व फॅमिली मेंबर्स यांनी स्वयंस्फुर्तीने परिश्रम घेतले. शेवटी सुन्यती इंटरनॅशनल फाऊंडेशन व आई सेंटर प्रो तर्फे सर्व सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थींना ध्यानाचे रेड बेल्ट, ऑरेंज बेल्ट, येलो बेल्ट व ग्रीन बेल्ट असे चार लेवल चे प्रमाणपत्र व सुप्रसिद्ध लेखक नागेश जोंधळे लिखित द डायनामिक सिरीजचे द बेसिक स्पोकन इंग्लिश कोर्स हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर प्रत्येक भारतीयांना लाखो वाक्य बोलण्यासाठी व लिहिण्यासाठी शिकविणारे पुस्तक देण्यात आले व शिबिरामध्ये सहभागी झालेले सर्व मान्यवरांचे ऋण व्यक्त करीत कार्यक्रमाची सांगता झाली.



**आष्टी : येथे बीड लोकसभेचे उमेदवार श्री बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ आले असता खासदार अमोल कोल्हे यांच्याशी चर्चा करताना कॉंग्रेस तालुकाध्यक्ष पाटोदा राहुल जाधव, यावेळेस प्रांताध्यक्ष आमदार जयंत पाटील.**

# पत्रकारितेमुळे संघर्ष करू शकले- किरण देशमुख

## आंतरभारती, आंबाजोगाईच्या 'मेरी बात'चे तिसरे पुष्प

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सातवीला असल्यापासून गावातील शेजाऱ्यांची पत्रे मी वाचून देत असे नंतर लिहून देऊ लागले, तेंव्हा पासून मला लिखाणाचा छंद लागला. ह्याच छंदा मुळे रोख ठोक लिहिण्याची सवय झाली व पत्रकार बनण्याची संधी मिळाली. आज त्याच पत्रकारितेने मला माझे अस्तित्व निमार्ण करण्याची संधी दिली आहे. असे प्रतिपादन किरण देशमुख (आसरडोहकर) यांनी आंतरभारतीच्या 'मेरी बात' या कार्यक्रमात आपला संघर्षमय जीवन परिचय करून देताना मनोगत व्यक्त केले.

किरण देशमुख यांनी त्यांचा संघर्षमय जीवन प्रवास सांगितला. लहानपणीच वडील गेले, त्यानंतर



आईने सांभाळ केला. मी शिकत असताना पत्रकारितेची सुरुवात केली. तीही ग्रामीण भागात. पत्रकारितेच्या सुरुवातीच्या काळात अमर हबीब व अशोक गुंजाळ काका यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. आपल्या वैवाहिक जीवनातील संघर्षाबद्दल त्यांनी सांगितले. संघर्षामुळे मी घडले व आज या पत्रकारिता मुळेच मी जिवंत आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. मेरी बातचे संयोजक व्यंकटेश जोशी यांनी भारताचे संविधान पुस्तक व संविधान उद्देशिका देऊन किरण देशमुख यांचे स्वागत केले.आंतरभारतीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष अमर हबीब, अनिता कांबळे, संतोष मोहिते, ग्रामीण विकास मंडळचे एस.बी. सय्यद आदी मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते. बालक मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जनसहयोग या मांवलोकच्या उपक्रमाच्या कार्यालयाच्या हॉल मध्ये कार्यक्रम झाला.

# धारूर शहरातील मुख्य बाजारपेठेतील रस्त्याची दूरावस्था; नगरपरिषदेचे दुर्लक्ष

धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरातील मुख्य बाजारपेठ असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते काशिनाथ चौक या परिसरामध्ये शहरातील मुख्य बाजार पेठ आहे नेहमीच वरदळीचा असणारा रस्ता पूर्ण खराब झाला आहे रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहे त्यामुळे बाजारपेठेत येणाऱ्या

वाहनधारकांना खड्डे चुकवत मार्ग काढावा लागतो.धारूर शहरातील मुख्य बाजारपेठेत नागरिकांना व वाहनधारकाना रस्ता शोधताना कसरत करावी लागते

रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये मुरूम कचकडी टाकून काम केले जाते परत आठ दिवसांमध्ये रस्त्यावरील खड्डे उघडे पडतात त्यामुळे अपघात होऊ शकतात. पावसाळ्यामध्ये जर खड्ड्यांमध्ये पाणी जमा झाल्यास तळ्याचे स्वरूप येऊ शकते पावसाळ्या आधीच रस्त्याची दुरुस्ती व्हावी अशी शहरातील मुख्य बाजारपेठेतील व्यापाऱ्यांची अपेक्षा आहे.

धारूर शहरातील मुख्य बाजारपेठेतील रस्ता असूनही अत्यंत खराब झाला आहे बाजारपेठेत येणाऱ्या ग्राहकांना खड्ड्यातून रस्ता शोधावा लागतो



त्यामुळे ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. नगरपरिषदेने हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करून व्यापारी व नागरिकांची अडचण सोडवावीयासाठी .

**-विशाल कुरुंद,व्यापारी धारूर**

# गेवराई येथे व्यापारी महासंघ, डॉक्टर्स असोसिएशन केमिस्ट्री असोसिएशनची बैठक

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई येथे व्यापारी महासंघ, डॉक्टर असोसिएशन केमिस्ट्री असोसिएशनची बैठक संपन्न झाली. या बैठकीला राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे, माजी मंत्री लोकनेते बदामराव पंडित आबा, माजी सभापती युद्धिजित दादा पंडित, धम्मापाल कांडेकर, श्रीनिवास बेदरे, महेश बेदरे, डॉ. अशोक काळे, डॉ.



कुटे यांच्यासह शहरातील व्यापारी, सर्व डॉक्टर्स आणि औषध विक्रेते उपस्थित होते.

यावेळी व्यापारी, डॉक्टर्स आणि औषध व्यापारी यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी तुमच्या सोबत राहीन असे आश्वासन बजरंग बप्पा सोनवणे यांनी त्यांना दिले.

# घराचे कुलूप तोडून रोख रकमेसह मौल्यवान वस्तू पळविल्या

## मीरा बाबुराव पोटभरे नावाच्या महिलेकडून ब्लॅकमेलिंगचा प्रकार; जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे पोस्टाद्वारे तक्रार, गुन्हा दाखल करण्याची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

एका माजी सरपंचाच्या मागे सतत पैशाचा तगादा लावीत खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत त्यांच्या माजलगाव शहरातील घराचे कुलूप तोडून रोख रकमेसह मौल्यवान वस्तू पळविण्याची घटना १२ एप्रिल रोजी घडली. याबाबत ब्लॅकमेलिंग करणाऱ्या मीरा बाबुराव पोटभरे या महिलेसह इतरावर गुन्हे दाखल करण्याची मागणी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे एका तक्रारी अर्जाद्वारे करण्यात आली आहे. या घटनेसंबंधातले सीसीटीव्ही फुटेज पोलीस अधीक्षक यांच्याकडे दाखल करण्यात आले असून, आता पोलीस प्रशासन याबाबत काय निर्णय घेते याकडे लक्ष लागले आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्याकडे जिजामाता नगर माजलगाव येथील रहिवाशी आणि मनूर या गावच्या मूळ रहिवासी प्रतिभा बाबासाहेब ढगे यांनी ही तक्रार दिली आहे. सदरील तक्रारीत म्हटले आहे की, माझे पती बाबासाहेब ढगे हे माजलगाव तालुक्यातील मनूर गावचे माजी सरपंच आहेत. ते राजकारणात असल्याने बऱ्याच लोकांशी त्यांचे हेवेदावे आहेत. मागच्या काही दिवसापूर्वी ते सतत चिंतेत असल्याचे मला दिसून आले याबाबत मी त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी माजलगाव येथील मीरा बाबुराव पोटभरे या महिलेचे नाव सांगत, ती मला सातत्याने ब्लॅकमेल करीत असून खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देत असल्याचे सांगितले. यामुळे माझे पती सतत मानसिक तणावात राहत होते. या मीरा पोटभरे नावाच्या महिलेने यापूर्वीही अनेकांना ब्लॅकमेल करून खोटे गुन्हे दाखल केले आहेत त्याच पद्धतीने ती बाबासाहेब ढगे यांना ब्लॅकमेल करीत होती असे तक्रारीत म्हटले आहे. तक्रारी अर्जानुसार एके दिवशी तक्रारदार प्रतिभा ढगे यांनी मीरा पोटभरे यांना फोनवरून जाब विचारला असता दोघींचे कडाक्याचे भांडण झाले. याचा राग मनात धरत मीरा पोटभरे आणि तिच्या इतर साथीदारांनी मनुर येथे जाऊन बाबासाहेब ढगे यांच्या घराचे नुकसान करण्याचा प्रयत्न केला. मात्र ढगे कुटुंबीय हे माजलगाव येथे राहत असल्याचे समजल्यानंतर दिनांक १२ एप्रिल २०२४ रोजी माजलगाव शहरातील जिजामाता नगर मध्ये राहत असलेल्या ढगे यांच्या घरी मीरा पोटभरे आणि तिची आई दाखल झाल्या. त्यावेळी घरी कोणी नसल्याने त्यांनी आरडा ओरड करीत गोंधळ घातला यावेळी त्यांनी घराचे कुलूप तोडण्याचाही प्रयत्न केला मात्र शेजाऱ्यांनी त्यांना तसे करू दिले नाही. पुन्हा त्याच दिवशी म्हणजे १२ एप्रिल रोजी सायंकाळी चारच्या सुमारास मीरा पोटभरे, तिची आई आणि इतर आठ ते नऊ जण ढगे राहतात त्या गल्लीमध्ये आले आणि त्यांनी ढगे यांच्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. सुमारे तासभर त्यांनी घरामध्ये गोंधळ घातला यावेळी घरातील सामानाची मोडतोड केली शिवाय घरात असलेले एक लाख २५ हजार रुपये आणि सुमारे साडेचार तोळ्याचे सोने-चांदीचे दागिने लंपास केले. याशिवाय या ठिकाणी त्यांनी सोबत आणलेले स्वतःचे कुलूपही घराला लावून टाकले. या ठिकाणी सीसीटीव्ही असल्याने हे सर्व त्यामध्ये कैद झाले आहे. सीसीटीव्ही बघितले असता यामध्ये मीरा बाबुराव पोटभरे, परमेश्वर उर्फ लिंबाजी बाबुराव पोटभरे, सुमन बाबुराव पोटभरे, अमोल दादाराव पंडित, गणेश दादाराव पंडित, प्रेम उर्फ भैय्या नितीन वडमारे आणि किसन दादाराव पंडित यांच्यासह इतर चार ते पाच जण अनोळखी चेहरे दिसून आले. या सर्वांनी संगणमत करीत घर तोडून घरातील मौल्यवान वस्तू रोख रकमेसह पळविल्या.

मीरा पोटभरे एवढ्यावरच थांबली नाही तर तिने बाबासाहेब नारायण ढगे, प्रतिभा बाबासाहेब ढगे, चंद्रकला बाबासाहेब ढगे व सिद्धेश्वर मनोहर पाटोळे यांच्या विरोधात १७ एप्रिल रोजी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात कलम ३७६ नुसार गुन्हा दाखल केला. हा गुन्हा खोटा असून आम्ही कधीच या मीरा पोटभरे नावाच्या महिलेशी भेटलेलो नाही असे तक्रारीत प्रतिभा ढगे यांनी म्हटले आहे. पोलिसात गुन्हा दाखल झाल्याने प्रत्यक्ष तक्रार देत येत नसल्याने, सत्य परिस्थिती सांगण्यासाठी पोस्टाद्वारे आपण ही तक्रार करीत असल्याचेही प्रतिभा ढगे यांनी पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. सदरील लोकांवर योग्य त्या पद्धतीने गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी या तक्रारी अर्जातून करण्यात आली आहे. आता पोलीस प्रशासन याचा तपास करून, काय भूमिका घेते याकडे लक्ष लागले आहे.

# पान ६ वरून...

पान ६ वरून...

## एलईडी व्हॅन, कलापथक

आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी प्रचाराचा आघाडी घेतली आहे वंचित बहुजन आघाडीचे चिन्ह गॅस सिलेंडर घराघरात पोहोचते केले आहे गाव, वाडी,वस्ती, तांडा, शहरात, वंचित बहुजन आघाडीचे गॅस सिलेंडर पोहोचवले आहे त्यामुळे मतदारातही उत्साह वाढला आहे नको महायुती, नको महाविकास आघाडी आता हवी वंचितांची वंचित बहुजन आघाडी असा सूर गाव, खेडे, शहरातील मतदारा मधून निघत आहे त्यामुळे वंचित बहुजन विकास आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

## पारदर्शक कारभार असणाऱ्यांना

पाहिजेत. गावच्या विकासासाठी सक्षम नागरिक म्हणून पुढे आले पाहिजे. मात्र मतदार आजही सक्षम होत नसल्याने सामान्य मतदाराला म्हणजेच जनतेला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. हे सर्व थांबवायचे असेल तर पारदर्शक कारभार करण्याची हमी देणाऱ्याला निवडून देणे आवश्यक आहे. हमी तर कोणीही देईल. पण त्याची पार्श्वभूमी देखील तपासली गेली पाहिजे. जोपर्यंत भ्रष्ट लोक घरी बसत नाहीत, जनता त्यांना घरी बसवत नाही, तोपर्यंत कारभार पारदर्शक राहणार नाही. म्हणून प्रत्येक मतदाराने जात, धर्म, पंथ न पाहता चांगल्या उमेदवाराला निवडून द्यावे, असे आवाहन देखील अँड. देशमुख यांनी केले आहे.

## ओबीसी मताचे विभाजन टाळण्यासाठी

दलित सर्व समाजाचे लोक मुंडे साहेबांच्या पाठीमागे खंबीर उभे राहायची महाराष्ट्र पुरोगामी आहेच आमचा बीड जिल्हा महापु रोगामी आहे मात्र मुंडे साहेबांचे अकाली निधन झाले आणि पुन्हा भाजपा वेगळ्या विचारसरणीवर गेला मात्र त्यांच्या कन्या पंकजाताई मुंडे आणि भाजपाचे साथ सोडली नाही गेली दहा वर्ष प्रीतम ताई च्या माध्यमातून बीड जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीचा खासदार आहे केंद्रात मोदी साहेबांचे सरकार आहे यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळत आहे गेली अनेक वर्षापासून कितपत पडलेला रेल्वे प्रश्न बीड जिल्ह्याच्या काही अंतरावर येऊन ठेपलेला आहे त्यामुळे बीड जिल्ह्याचे रेल्वेचे स्वप्न लवकरच साकार होणार आहे बीड जिल्ह्यात रेल्वे आल्यास अनेक उद्योग धंदे येथील तरुणांच्या हाताला काम मिळेल म्हणून मुंडे घराण्यांचं कुणीतरी दिल्लीचा आवश्यकच आहे महाराष्ट्रात सर्वात अगोदर पंकजाताई मुंडे यांची उमेदवारी घोषित झाली मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनामुळे बीड जिल्ह्याचे महाराष्ट्र ढवळून निघाला ओबीसी समाज भेटीत झाला ओबीसींची बाजू घ्यायला कोणीच तयार होत मात्र भुजबळ साहेबांनी ओबीसींच्या न्याय हक्कासाठी आणि संरक्षणासाठी पुढे येऊन मनाचा मोठेपणा दाखविला आणि ओबीसींना दिलासा मिळाला अशावेळी पंकजाताई ओबीसीच्या संरक्षणासाठी काही अडचणीमुळे उपस्थित राहू शकले नाही. भारतीय जनता पार्टीला मत मिळावे म्हणून भुजबळांचा फोटोही टाळावा लागला मात्र माळी समाज आणि सकल ओबीसी समाज आपलं नेतृत्व संपून जावं एवढा कोत्या मनाचा नाही म्हणून ओबीसी मराठा आंदोलनाने दूषित झालेल्या वातावरणात ओबीसी मताचे विभाजन होऊन आपलं बीड जिल्ह्यातील विकास प्रिय नेतृत्व संपुष्टात येऊ नये म्हणून बीड लोकसभेसाठी दाखल केलेली उमेदवारी मागे घेऊन सकल ओबीसी समाजाच्या प्रेमा खातर पंकजाताईच्या प्रचारासाठी जिवाचे रान करून निवडून आणणार असल्याचे मत माळी समाजाचे युवा नेते संतोष रासवे यांनी व्यक्त केले.

## मोदी हुकूमशाहीला गाडण्यासाठी

टाकून त्यांना वेटीस धरण्याचा आणि त्रास देण्याचे काम मोदी सरकारने आणि मिंधे सरकारने केले. सर्व जाती धर्मांना बरोबर घेऊन महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे काम करत आहेत पालकमंत्री मुंडे आणि मुंडे भगिनी बीड जिल्हा च्या विकासासाठी मते मागत फिरत आहे पण बीड जिल्ह्यातील सत्ता गेल्या वीस वर्षांपासून त्यांच्या कडेच आहे मग तेंव्हा विकास का करता आला नाही याचे उत्तर त्यांनी दिले पाहिजे बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी अशी अवस्था त्यांची झाली आहे बीड जिल्ह्यातील जनता आता त्यांच्या भूलथापांना भूलनार नाही त्यामुळे यावेळेस शेतकऱ्यांनी व जिल्ह्यातील जनतेने महाविकास आघाडी चे नेते शरदचंद्रजी पवार साहेब व शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या पाठीशी उभे राहून बीड जिल्ह्यातील लोकसभा उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे.

## जाहीर प्रगटन

**अॅड. एन के सिरसट**

**मा. श्रीमती पी डी चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

किरकोळ दिवाणी अर्ज ६३७/२०२४

**आशाबाई भ्र. अंकुश आहेर व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. आशाबाई भ्र. अकुंश आहेर, वय-४७ वर्षे, धंदा-घरकाम रा. वरवटी, ता. जि. बीड २. अर्चना पि. अंकुश आहेर, वय ३३ वर्षे, धंदा-घरकाम रा. वरवटी, ता. जि. बीड ३. शारदा भ्र. वसंत बहीरवाळ, वय-२८ वर्षे, धंदा-घरकाम रा. पिंपळवाडी, ता. जि. बीड ४. शिवलाल पि. अंकुश आहेर, वय-२७ वर्षे, धंदा-शेती रा. वरवटी, ता. जि. बीड ५. वर्षा पि. अंकुश आहेर, वय-२४ वर्षे, धंदा-घरकाम रा. वरवटी, ता. जि. बीड

(अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

**मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात अंकुश झुंबर आहेर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी अंकुश झुंबर आहेर यांचा मृत्यु अनुक्रमे दिनांक १६.०२.२०२३ रोजी मौजे वरवटी ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क २ ३ व ५ हया मयताच्या मुली असुन अर्जदार क ४ हा मयताचा मुलगा आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचं आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्कावद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत अंकुश झुंबर आहेर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २० माहे एप्रिल २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १४ जुन. २०२४.**

याची एक प्रत डकवणे

१. मा. दिवाणी न्या. व. स्तर, नोटीस बोर्डावर,
२ गमपंचायत कार्यालय, वरवटी, ता. जि.बीड नोटीस बोर्डावर,
३. मयताचे राहते घरी मौजे वरवटी, ता. जि. बीड

**आदेशावरुन**
**स्वाक्षरित/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.**

**क. लिपीक** **कोर्टाचा शिक्का**

cmyk

# पुढील ४८ तासांत उष्णतेची लाट!

## मराठवाडा, विदर्भात अवकाळी पावसाचा अंदाज

मुंबई : महाराष्ट्रात पुढील ४८ तासांत तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. तर राज्यात काही भागात वादळी वारा, विजांचा कडकडाट आणि जोरदार अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. राज्याचे कमाल तापमान हळूहळू कमी होण्यापूर्वी काही दिवस वाढण्याची अपेक्षा आहे. त्यामुळेच पुढील दोन दिवसात राज्यात तापमनात वाढ होण्याची शक्यता आहे. दरम्यान, किमान तापमान स्थिर राहण्याचा अंदाज आहे.

७ मे पासून अवकाळी पावसाची शक्यता

महाराष्ट्रात पुढील ४८ तासात कमाल तापमानामध्ये वाढ होऊन त्यानंतर तापमान हळूहळू घसरण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. राज्यात सरासरी तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने बदल होण्याची शक्यता आहे. सोलापूर, लातूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्याच उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

पुढील ४८ तासांत मुंबई, पुण्यासह राज्याच्या





काही भागात उष्ण, दमट हवामानाची शक्यता आहे. मराठवाडा आणि विदर्भात ७ मे पासून पावसाची शक्यता आहे.

राज्यात या ठिकाणी पावसाची शक्यता

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागात आज पावसाची शक्यता आहे. नांदेड, लातूरमध्ये अवकाळी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर धाराशिवमध्येही तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. यासोबतच विदर्भात विजांच्या गडगडाटासह अवकाळी पावसाची हजेरी पाहायला मिळेल. भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पावसाची शक्यता असून हवामान विभागाकडून यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

### उष्माघाताच्या रुग्णांमध्येही वाढ, खबरदारीचं आवाहन

मराठवाडा आणि विदर्भामधील काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. काही भागात विजेच्या कडकडाटासह वाऱ्याचा पाऊस पाहायला मिळण्याची शक्यता आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचं नुकसान होण्याची शक्यता आहे, त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. उन्हाचा पारा वाढल्यामुळे अनेक भागात उष्माघाताच्या रुग्णांमध्येही वाढ होताना दिसत आहे. यामुळे आरोग्य प्रशासनाकडून घराबाहेर पडताना खबरदारीचे उपाय करण्याचं आवाहन करण्यात येत आहे.

# असे तयार करा गांडूळ खत



सध्याच्या घडीला अनेक शेतकरी जास्तीत जास्त उत्पादन मिळवण्यासाठी, भरपूर रासायनिक खतांचा वापर करताना दिसत आहेत. तर एकीकडे काही शेतकरी सेंद्रिय शेतीकडे देखील वळताना दिसत आहेत. आरोग्याच्या दृष्टीने पाहिले तर भविष्यामध्ये सेंद्रिय शेतीला चांगले दिवस येणार आहेत. गांडूळ खत हा सेंद्रिय शेतीमधील एक महत्वाचा घटक आहे.

गांडूळ खत हे शेतकरी स्वतः तयार करू शकतात. त्यामुळे पिकाच्या उत्पादन खर्चात खूप बचत होते. तसेच शेतीचा पोत देखील सुधारतो. त्याचबरोबर गांडूळ खत निर्मितीकडे शेतीपूरक जोडधंदा म्हणून देखील पाहिले जाते. गांडूळ हा जमिनीत राहणारा प्राणी असून, तो जमिनीतील सेंद्रिय पदार्थ खातो. ते खाल्ल्यानंतर त्याच्या शरीराला आवश्यक असा भाग सोडून, उर्वरित भाग विष्ठा म्हणून शरीरातून बाहेर टाकतो, त्यालाच गांडूळ खत किंवा वर्मी कंपोस्ट खत असे म्हणतात. या संपूर्ण क्रियेला २४ तासांचा कालावधी लागतो. गांडूळ जेवढे पदार्थ खातो त्यापैकी स्वतःच्या शरीरासाठी फक्त दहा टक्के भाग ठेवतो व बाकीचा नव्वद टक्के भाग शरीरातून बाहेर टाकतो. जे वनस्पतीच्या वाढीसाठी लागणारी अन्नद्रव्ये, संप्रेरके, उपयुक्त जीवाणू वनस्पतीची रोग प्रतिकारक क्षमता वाढवितात.

गांडूळ खत निर्मिती कशी करावी?

गांडूळ खत निर्मितीसाठी जागा निवडत असताना सावली असेल अशी जागा निवडावी. एखाद्या झाडाखाली, छपरामध्ये किंवा खोलीमध्ये गांडूळ खताचा बेड असावा. जिथे बेड असेल तेथील जमीन टणक असावी. जेणेकरून गांडूळ जमिनीमध्ये जाणार नाहीत याची काळजी घ्यावी. अलीकडे प्लास्टिकचे रेडिमेड बेडही मिळत आहेत. त्याचा देखील तुम्ही वापर करू शकता. २० फूट लांब ३ फूट रुंद आणि २ फूट उंच असा बेड तयार करावा. सुरवातीला त्यामध्ये पालापाचोळा, उसाचे पाचट गवत ६ इंचाचा थर करावा. त्यावर एक ते दीड फूट शेणखत टाकावे. आता यावर २ किलो गांडूळ सोडावे आणि त्यावर बारदाणाने (पोत्याने) झाकून १० ते २० लिटर पाणी रोज मारावे. पोती झाकताना वापसा राहील याची काळजी घ्यावी. सात ते आठ दिवसात गांडूळाची विष्टा दिसायला लागेल. याचाच अर्थ आपला गांडूळ खत तयार होत आहे. अशा पद्धतीने ३० ते ३५ दिवस पाणी मारत राहावे. त्यानंतर तुम्हाला निदर्शनास येईल, कि गांडूळ खत तयार झाले आहे. मग काही दिवस पाणी मारणे बंद करावे. गांडूळ खत कोरडे झाल्यानंतर त्या गांडूळ खताला छोट्या भागात विभागून चाळून घ्यावे. हे खत गोणीमध्ये भरून ठेवावे लागेल तसे वापरावे.

# फ्लॉवर पिकांमधील गड्डा सड रोग

महाराष्ट्रात फ्लॉवर हे एक महत्त्वाचे भाजीपाला पीक आहे, ज्याची लागवड सुमारे १६,००० हेक्टरवर होते. नाशिक, नगर आणि पुणे हे या पिकाचे प्रमुख उत्पादक जिल्हे आहेत. फ्लॉवर पिकांमध्ये अनेक रोगांचा प्रादुर्भाव होतो, त्यापैकी गड्डा सड हा एक प्रमुख रोग आहे. हा रोग पानांवर आणि गड्ड्यांवर दिसून येतो आणि त्यामुळे पिकाचे मोठे नुकसान होते.

लक्षणे : सुरुवातीला जुन्या पानांवर तपकिरी रंगाचे ठिपके दिसून येतात. हळूहळू हे ठिपके अर्धा इंचापर्यंत वाढू शकतात आणि एकमेकांभोवती पडलेल्या वर्तुळाप्रमाणे दिसतात. कालांतराने नवीन पानांवरही हे ठिपके दिसून येतात आणि पाने वाळून गळून पडतात. फ्लॉवरच्या गड्ड्यांवर काळसर रंगाचे ठिपके दिसू लागतात आणि हळूहळू संपूर्ण गड्डा काळसर होतो.

रोगाचे कारण : हा रोग अल्टरनेरिया ब्रासिसिकोला नावाच्या बुरशीमुळे होतो. हा रोग बीजाणूंद्वारे बियाणे, जमीन आणि पिकांच्या अवशेषांमधून पसरतो.

आर्द्रता आणि तापमान : ८५ ते ९० टक्के आर्द्रता आणि २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमान या रोगासाठी अनुकूल आहे.

इतर घटक : पाण्याचा ताण, अन्नद्रव्यांची कमतरता, किडींचा प्रादुर्भाव यामुळेही रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. रोगाची लक्षणे : पानांवर तपकिरी रंगाचे ठिपके दिसतात जे एकमेकांभोवती पडलेल्या वर्तुळाप्रमाणे दिसतात. हळूहळू ठिपके वाढून पान पूर्णपणे वाळून जाते. फ्लॉवरच्या गड्ड्यांवर काळसर रंगाचे ठिपके दिसून येतात आणि हळूहळू संपूर्ण गड्डा काळसर होतो. नुकसान : या रोगामुळे साधारणतः १० ते ४० टक्क्यांपर्यंत पिकाचे नुकसान होऊ शकते.नियंत्रणाचे उपाय : प्रमाणित बियाण्यांचा वापर. बियाण्यांना बुरशीनाशकांची बीजप्रक्रिया. पीक फेरपालट. योग्य जलव्यवस्थापन. संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन. किडींचे नियंत्रण. रोगग्रस्त पाने आणि गड्डे त्वरित नष्ट करणे.

रोगप्रतिकारक उपाय : शिफारस केलेल्या बुरशीनाशकांचा वापर. जैविक बुरशीनाशक जसे की ट्रायकोडर्मा व्हिरीडीचा वापर.

शिफारस केलेल्या बुरशीनाशकांचा वापर तज्ञांच्या सल्ल्यानेच करावा. रोगाचा प्रादुर्भाव दिसल्यास ताबडतोब कृषी तज्ञांचा सल्ला घ्या. अधिक माहितीसाठी आपण आपल्या जवळच्या कृषी विद्यापीठ किंवा कृषी विज्ञान केंद्राचा संपर्क साधू शकता.





## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८६३ : आंतरराष्ट्रीय मानवतावादी चळवळ म्हणजेच आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस चळवळीची स्थापना करण्यात आली.
१८८६ : डॉ.जॉन स्टाइथ पेम्बरटनने कोका कोला प्रथमतः तयार केले.
१८९९ : क्रांतिकारक वासुदेव चाफेकर यांना फाशी.
१९१२ : पॅरामाउंट पिक्चर्स या कंपनीची स्थापना झाली.
१९३२ : पं. विष्णू दिगंबर पलुसकर यांचे शिष्य पं. विनायकराव पटवर्धन यांनी पुणे येथे गांधर्व महाविद्यालय सुरू केले.
१९३३ : महात्मा गांधींचे २१-दिवसांचे उपोषण चालू.
१९४५ : दुसरे महायुद्ध युरोप विजय दिन जर्मनीची दोस्त राष्ट्रांसमोर बिनशर्त शरणागती, युरोपमधील युद्ध समाप्त.
१९५४ : केंद्र सरकारने चंद्रनगरला पश्चिम बंगाल प्रांतात समाविष्ट केले.
१९६२ : पश्चिम बंगाल येथील कोलकाता येथे रवींद्र भारती विद्यापिठाची स्थापना.
१९७४ : रेल्वे कामगारांचा देशव्यापी संप झाला. सरकारविरुद्धचा असंतोष वाढत जाऊन आणीबाणी पुकारली जाण्याला जी कारणे घडली, त्यात हा संप महत्त्वाचा मानला जातो.
१९९४ : ब्रिटन व फ्रान्सला जोडणार्या इंग्लिश खाडीच्या खालून खोदलेल्या युरो टनेल या बोगद्याचे उदघाटन
२००४ : प्रसिद्ध श्रीलंकन क्रिकेटपटू गोलंदाज मुथैया मुरलीधरन यांनी ५२१ खेळाडू बाद करण्याचा विश्वविक्रम आपल्या नावे केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२८ : रेड क्रॉस या संस्थेचे सहसंस्थापक हेनरी डूनेंट यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑक्टोबर १९१०)
१९०६ : भारताचे माजी भूसेनाप्रमुख प्राणनाथ थापर यांचा जन्म.
१९१६ : स्वामी चिन्मयानंद यांचा जन्म. (मृत्यू: ३ ऑगस्ट १९९३)
१९१६ : भारतीय सिनेमॅटोग्राफर रामानंद सेनगुप्ता यांचा जन्म.
१९२६ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय इतिहासकार तपन राय चौधरी यांचा जन्मदिन.
१९२९ : भारतीय पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण तसचं हिंदुस्थानी संगीत क्षेत्रांत दिला जाणारा संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित बनारस घराण्याच्या भारतीय शास्त्रीय गायिका गिरीजा देवी यांचा जन्मदिन. त्यांनी गायिलेला ठुमरी हा शास्त्रीय संगीत प्रकारासाठी त्या विशेष ओळखल्या जातात.
१९७० : ऑस्ट्रेलियन क्रिकेटखेळाडू मायकेल बेव्हन यांचा जन्म.
१९८९ : भारतीय बेसबॉलपटू दिनेश पटेल यांचा जन्म.
१८१७ : देवेंद्रनाथ टागोर ह्याचा जन्मदिवस

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२० : पाली भाषा व बौद्ध साहित्य या विषयावरचे अभ्यासक चिंतामण वैजनाथ राजवाडे यांचे निधन.
१९१५ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्वातंत्र्यसेनानी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे राजकीय नेता अमीरचंद बोंबवाल यांचे निधन.
१९२० : भारतीय प्राचीन कालीन भाषा पाली व बौध्द साहित्याचे अभ्यासक चिंतामण वैजनाथ राजवाडे यांचे निधन
१९७२ : भारत रत्न पुरस्कृत पांडुरंग वामन काणे यांचे निधन. (जन्म: ७ मे १८८०)
१९८१ : संस्कृतज्ञ, मराठी कवी डॉ. केशव नारायण वाटवे यांचे निधन.
१९८२ : अनिल उर्फ कवि अनिल (आत्माराम रावजी देशपांडे), मराठी कवी.
१९९३ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय इतिहासकार व मार्क्सवादी तत्त्ववेत्ता देवीप्रसाद चट्टोपाध्याय यांचे निधन.
१९९५ : पत्रकार, संपादक, राजकीय विश्लेषक आणि मुत्सद्दीप्रेम भाटिया यांचे निधन. (जन्म: ११ ऑगस्ट १९११)
१९९५ : देवदेवतांची आणि संतांची चित्रे यामुळे प्रसिद्ध असलेले चित्रकार जि. भी. दीक्षित यांचे निधन.
१९९९ : कलादिग्दर्शक श्रीकृष्ण समेळ यांचे निधन.
२००३ : संस्कृत व प्राकृत विद्वान डॉ. अमृत माधव घाटगे यांचे निधन. (जन्म: १० ऑगस्ट १९१३)
२०१३ : धृपद गायक झिया फरिदुद्दीन डागर यांचे निधन. (जन्म: १५ जून १९३२)

# उन्हाळ्यात जनावरांची प्रजनन क्षमता कमी होण्याची कारणे आणि उपाय

वातावरणातील बदलाचा जनावरांच्या उत्पादनावर परिणाम होतो आणि सर्वात जास्त परिणाम हा प्रजननावर होतो. उन्हाळ्यात जनावरे गाभण राहण्याचे प्रमाण कमी असते. याची कारणे, परिणाम आणि उपाययोजना याची माहिती असल्यास या समस्येवर मात करता येईल.

गाभण न राहण्याची कारणे : चारा आणि पाण्याचा प्रभाव - उन्हाळ्यात जनावरे कमी चारा आणि जास्त पाणी पितात. त्यामुळे रवंथ क्रिया कमी होऊन अपचन होते आणि आम्लाचे प्रमाण वाढते.

योग्य व संतुलित आहार न मिळाल्याने -: जनावरांच्या गर्भाशयाचे मुख माजाच्या काळात व विल्यानंतर उघडे असते. या काळात जनावरांचा गोठा घाण असेल तर जंतूसंसर्ग होण्याचा धोका असतो. हा जंतूसंसर्ग घाणीतून योनीमार्गाने गर्भाशयात जाऊन गर्भाशयाचा दाह होतो. योग्य व संतुलित आहार न मिळाल्याने खनिजे व जीवनसत्त्वांच्या व काही विशिष्ट संप्रेरकाच्या कमतरता निर्माण होतात. उन्हाळ्यात उपलब्ध होणारा चारा कमी पौष्टिक आणि प्रथिनयुक्त असतो. याचा परिणाम जनावरांच्या आरोग्यावर होतो. प्रथिनांच्या कमतरतेमुळे जनावरांची वाढ मंदावते, उत्पादन व प्रजनन क्षमता कमी होते.

क्षारांचे प्रमाण कमी होणे - घामावाटे सोडियम



आणि पोटॅशियम यांसारख्या क्षारांचे प्रमाण कमी होते. इतर कारणे - उष्णतेमुळे जनावरांच्या शरीरात ताण निर्माण होतो, ज्यामुळे प्रजनन क्षमता कमी होते. तसेच, उन्हामुळे जनावरांची लैंगिक इच्छा कमी होते.

परिणाम : गाभण न राहणे, गर्भपात, वेतामधील अंतर वाढणे, दुधाचे उत्पादन कमी होणे.

उपाययोजना : योग्य निवारा - उन्हापासून जनावरांना बचावासाठी सावलीदार आणि हवेशीर निवारा उपलब्ध करून द्या.

पोषण - उन्हाळ्यात जनावरांना पौष्टिक आणि संतुलित आहार द्या. यामध्ये हिरव्या चाऱ्यासोबतच दाणे आणि खनिज मिश्रण द्या.

शुद्ध पाणी - जनावरांना स्वच्छ आणि थंड पाणी पुरवठा करा.

कृत्रिम रेतन - योग्य वेळी कृत्रिम रेतनद्वारे जनावरांचे प्रजनन करा. पशुवैद्याची मदत - जनावरांमध्ये प्रजननक्षमतेची समस्या असल्यास पशुवैद्याची मदत घ्या.

उलटण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी : जनावरांना दररोज ५० ग्रॅम खनिज मिश्रण द्या. उन्हाळ्यात म्हशींचा माज ओळखून वेळीच रेतन करा. सकाळी जनावरांचे निरीक्षण करून माजाची लक्षणे ओळखा. जनावरांना योग्य वेळी फळवा.

उन्हाळ्यात जनावरांची काळजी : जनावरांना योग्य निवारा, पोषण आणि शुद्ध पाणी द्या. हिरवा व सुका चारा खाऊ घाला. प्रथिनयुक्त खुराक किंवा चारा द्या. रेतन सकाळी किंवा संध्याकाळी करा.

इतर उपाय : दरवर्षी सांसर्गिक गर्भपाताची चाचणी करून घ्या. विलेल्या जनावराचा वार स्वतः काढण्याचा प्रयत्न करू नये. गर्भाशयाचे गंभीर आजार झालेल्या जनावरांना वेगळे करा. गर्भपात झालेले गर्भ आणि वार गोठ्यापासून दूर टाका. उन्हाळ्यात जनावरांची प्रजनन क्षमता कमी होण्याची अनेक कारणे आहेत. योग्य निवारा, पोषण, पाणीपुरवठा आणि कृत्रिम रेतन यांसारख्या उपाययोजनांद्वारे उन्हाळ्यातही जनावरांची प्रजनन क्षमता वाढवता येऊ शकते.

# एक लिंबू मिळतो १० रुपयाला; लिंबाच्या दरात मोठी वाढ

मे महिनाच्या सुरवातीला राज्यात प्रचंड उकाडा जाणवत असून, दुपारच्या सुमारास घराबाहेर पडणे देखील मुश्किल झाले आहे. ज्यामुळे सध्या बाजारात लिंबाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी, सध्या लिंबांच्या दरात वाढ झाली असून, लिंबू प्रतिकिलो २०० ते २५० रुपयांवर पोहोचला आहे. तर एका लिंबासाठी दहा रुपये मोजावे लागत आहेत. एका किलोत आकारानुसार साधारण वीस ते तीस लिंबू येतात. ज्यामुळे सध्या लिंबू उत्पादकांना चांगले दिवस आल्याचे पाहायला मिळत आहे.

प्रामुख्याने हिवाळ्यात लिंबाचे दर नियंत्रणात होते. मात्र, तापमानात जसजशी वाढ होत आहे. तसतशी लिंबांच्या भावातही वाढ होत आहे. पाच रुपयाला मिळणारा एक लिंबू दहा रुपयांवर जाऊन पोहोचला आहे. तर प्रति किलो २०० रुपयांवर लिंबाचे भाव पोहोचले आहेत. घाऊक लिंबू घेणाऱ्यांना दर कमी करून दिले जातात. मात्र, एक किंवा दोन लिंबू घेणाऱ्यांना प्रति नग दहा रुपयाने विकत घ्यावा लागत आहे.



उन्हाळा संपेपर्यंत लिंबूचे दर असेच चढे राहतील, अशी शक्यता लिंबू व्यावसायिकांकडून व्यक्त केली जात आहे. कोल्हापूर, बेळगाव आदी बाजारांतून राज्यात लिंबाची आवक होत असते. मागे मॉन्सूनोत्तर आणि अवकाळी पावसाचा फटका हस्त बहाराला बसला. अपेक्षित फूल आणि फळधारणा झाली नाही. परिणामी सध्या बाजारात लिंबाची आवकच मंदावली आहे. त्यातुलनेत उष्णतेमुळे आवक मात्र मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे लिंबाचे भाव प्रति किलो २०० रुपयांवर पोहोचले आहेत. असे लिंबू बाजारातील जाणकारांकडून सांगितले जात आहे.

# आधुनिक काळात पारंपारिक गावरान आंबा होतोय नामशेष

## रसायनांचा वापर करून उत्पादित केलेल्या अनेक जाती बाजारात उपलब्ध

ज्योतिराव पाढरपोटे

**माजलगाव:** वैशाख म्हटले की हमखास पुरणपोळी आणि आमरसाचा बेत निश्चित असायचा. अक्षय्य तृतीयेला आंब्याच्या आमरसावर ताव मारूनच या हंगामाची सुरूवात व्हायची, मात्र निसर्गाच्या अवकृपेमुळे शेत शिवारातील बांधावरची आंब्याची झाडे कमी होऊ लागल्याने गावरान आंबा आता नामशेष होत आहे.

माजलगाव तालुक्यात वीस वर्षांपूर्वीपर्यंत ग्रामीण भागातील शेताच्या बांधावर गावरान आंब्याची अनेक झाडे असायची.एखादा शेतकरी वगळता प्रत्येकाच्या शेतात किमान एक तरी गावरान आंब्याचे झाड हमखास असायचे.खरीप पेरणीपूर्व मशागतीनंतर दुपारची विश्रांती गर्द गावरान आंब्याच्या सावलीत शेतकरी घ्यायचे. गेल्या काही वर्षापासून सुरू असलेल्या वृक्षतोडीने आंब्याची झाडे कमी होऊ लागली आहेत. उन्हाळ्याच्या दिवसात गावामध्ये घरांत आंब्याची आढी ठरलेली असायची. अलीकडच्या काळात गावरान आंब्याबरोबर आढी आता दुरापास्त झाली आहे.काही भागात आंब्याची झाडे शिल्लक आहेत,पण तेथेही वाढते तापमान अवकाळी पावसाचा तडाखा, गारपीट अशा वातावरणामुळे फळधारणा झालेली नाही.हवामानातील बदल,वृक्षतोड,शेत-शिवारात महागड्या औषधांचा वाढता वापर यामुळे ग्रामीण भागातून गावरान आंब्याची झाडे कमी होऊ लागली आहेत. गावरान आंब्याच्या रसाची मेजवानी काळाच्या पडद्या आड गेली आहे. सर्वसामान्यांना गावरान आंबा विकत घेणे परवडतो परंतु सध्या शेतकऱ्यांची अशी आमराई दुर्मिळ होत आहे.गावरान आंब्याची जागा आता कृत्रिम रसायने वापरून पिकलेल्या आंब्याने घेतल्यामुळे गावरान आंब्याचे दर्शन बाजारात नामशेष होत चालले आहे.रविवारच्या आठवडी बाजारात हापूस,केसर,बदाम, पायरी मलाईका, तोतापुरी,लंगडा, दशेरी इत्यादी विविध आंब्याचे प्रकार बघायला मिळतात परंतु गावरान आंबा मात्र हद्दपार झालेला दिसून येत आहे.



### पुढील काळात आवक वाढण्याची शक्यता

सद्यस्थितीत बाजारपेठेत मुबलक प्रमाणात आंबा दिसून येत नसला तरी जून महिना अखेरपर्यंत आंब्याची मागणी राहणार आहे. येणाऱ्या वटपौर्णिमा या सणानिमित्ताने आंबा मोठ्या प्रमाणात खरेदी केला जातो. या कालावधित आंब्याची आवक वाढण्याची शक्यता असून कर्नाटक, आंध्रप्रदेश आदी भागातून विविध जातीचे आंबे बाजारात दाखल होत आहेत.आंब्याला सध्या १६० रुपयापासून ते अडीचशे रुपयांपर्यंत प्रतिकिलो दर असून येत्या काळात वाढ होण्याची शक्यता आहे.

### जुन्या जाती आता केवळ आठवणीतच उरल्या

आजच्या बदलत्या युगात शेतीत मोठ्या प्रमाणात आधुनिक क्रांती झाल्याने पूर्वी साधारणत: ६०-७०-८० च्या दशकात शेताच्या बांधावर दिसणारी गावरान आंब्यांची झाडे आता कोठेतरी एखाद दुसरेच अपवादाने एखाद्या गावात आढळते.पूर्वी केशर आंबा,खोबरी आंबा,केळी आंबा, साखरी आंबा,शेंदरी आंबा,लोद्या आंबा अशा कितीतरी आंब्यांच्या व्हरायटी होत्या.या जाती अस्सल आणि गावरान असल्याने त्याला एक वेगळीच स्वाद व चव होती. प्रत्येक गावात या विविध प्रकारच्या गावरान आंब्यांची सुमारे ३०० ते ४०० झाडे सहज आढळायची.आता एखाद्या गावात गावठी आंब्यांची १०-१५ झाडेच दिसून येतात.

### कृषी विद्यापिठांचे प्रयत्न नाहीतच

आज महाराष्ट्रात शासनाची मोठमोठी कृषी विद्यापिठ उत्तम असून त्यातून पिके व फळांच्या विविध जातींचे संशोधन होते. कृषी विद्यापिठातून गावरान आंब्यांच्या या जुन्या जातींचा शोध घेवून त्यांच्या पुनर्निर्मितीचा प्रयत्न करायला हवा,तरच या गावरान आंब्यांच्या जुन्या जातींचे जतन होईल.

### गावरान आंब्यांच्या जातींचे जतन व्हावे

अद्यापही काही गावांतून वरील वेगवेगळ्या जातीच्या आंब्यांची झाडे आढळतात. त्यांच्या पुनर्निर्माणासाठी कृषी विभागाने प्रयत्न करण्याची गरज आहे

### चला तर कामाला लागूया...

शालेय विद्यार्थ्यांना हाताशी धरुन जुन्या गावरान आंब्यांच्या झाडांच्या कोयांचे रोपण कृषी विभागाने ठराविक क्षेत्रात केले तर गावरान आंब्यांच्या जुन्या जातींचे जतन निश्चितच होईल.'चला तर आत्तापासूनच कामाला लागूया,२०२४ गावरान आंबा निर्मितीचे वर्ष बनवूया.

गेली अनेक वर्षे बाजारपेठेतून गावठी आंब्यांचे प्रमाण नगण्य राहिले असून गावागावातून ही झाडे नामशेष होत चालली आहेत.नावानुसार स्वाद देणाऱ्या या गावठी आंब्यांच्या जातींच्या पुनर्निर्माणाचा प्रयत्न व्हायला हवा,अशी आता मागणी होत आहे.केशर लागवडीसाठी प्रयत्न हवेत नवीन संशोधनातून आंब्यांच्या आता वेगवेगळ्या जाती बाजारात येत असून त्याकडेच लोक आकर्षित होताना दिसतात

# ऐन उन्हाळ्यात वैद्यनाथ मंदिर प्रशासनाचा नियोजनशून्य कारभार

परळी । प्रतिनिधी

एप्रिल संपला आता मे महिना चालू झाला असून उन्हाचा पारा ४० अंशांपर्यंत पोचला आहे. उन्हाचे चटके भाविकांना मोठ्या प्रमाणात बसत असून श्री वैद्यनाथ मंदिर प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे श्री वैद्यनाथ मंदिरात भाविकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. मंदिर परिसरात भाविकांना उन्हापासून संरक्षण करण्यासाठी मंडप उभारणी करण्यात यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा माजी नगराध्यक्ष श्री अभयकुमार उर्फ पप्पू ठक्कर यांनी केली असून लवकरात लवकर मंडप उभारणी करून भाविकांची होणारी पायपोळ थांबवावी अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशाराही त्यांनी दिला आहे.




यंदा हे महिना उजाडला, तरीही वैद्यनाथ देवस्थान कमिटीकडून अद्याप मंडप उभारण्यात आलेला नाही. यामुळे भाविकांना मंदिर परिसरात उन्हाचा त्रास सहन करावा लागत आहे. सकाळी ९ पासूनच उन्हाचे चटके बसण्यास प्रारंभ होतो. त्यामुळे मंदिर परिसरात भाविकांच्या पायांना चटके बसू नयेत म्हणून फरशांना पांढर्या रंगाचा कोट मारणे अपेक्षित आहे, तेही करण्यात आलेले नाही. सध्या उन्हाळी सुट्टी असल्याने १२ ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथाच्या दर्शनासाठी देशभरातून भाविक भक्त मंदिरात येतात. या भाविकांना उन्हापासून संरक्षण देणारी कोणतीही व्यवस्था मंदिर प्रशासनाने केलेली नाही. मंदिर परिसरात जागोजागी पाणपोई करणे अपेक्षित असतांना ती नसल्याने भाविकांनी पाणी विकतच घेऊन प्यावे लागत आहे. यात भाविकांची मोठ्या प्रमाणात लूट होत असल्याचेही अभयकुमार ठक्कर यांनी म्हटले आहे.

# शेकडो वर्षापुर्वीचे वटवृक्ष नामशेष होण्याच्या मार्गावर

## वटवृक्षावर बागडणाऱ्या पक्षांचा किलबिलाट झालाय दुर्लभ; वृक्षसंवर्धनाची आवश्यकता

बीड । प्रतिनिधी

निसर्गाचा समतोल राहण्यासाठी वृक्षसंगोपण जितकं गरजेचं आहे तितकंच त्या वृक्षांची देखभाल करून वृक्ष संगोपण सुद्धा गरजेचं आहे तरच हवामानात होत असलेला बदल व दुष्परिणाम कमी होण्यास मदत होणार आहे यासाठी सर्वांनी राष्ट्रीय कर्तव्य समजुन नैतिक जबाबदारी पार पाडायला हवी.रस्ते विकासाच्या कामात शेकडो वर्षापुर्वीच्या वृक्षांची कत्तल करण्यात आली त्या बदल्यात रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्याचे बंधन असताना कागदोपत्री वृक्षलागवड झाल्याचे दिसून येत आहे तर शासनाच्या कोट्यवधीं वृक्षलागवड मोहीम दिशाभूल करणारी फसवी असल्याचे निदर्शनास आले आहे.

एक वटवृक्ष एका हंगामात १ कोटी लिटर पाणी जमिनीत घेऊन जातो तेही पन्नास फुटांच्या खाली पाषाणालाही भेदुन ८०० ते १००० फुटावर पोहचतात.१ कोटी लिटर म्हणजे एका सर्वसाधारण घरगुती विहिरीचा शंभर वेळा उपसा करावा एवढं पाणी याचा गणितीय हिशोब सांगायचा झाला तर ३५ एकर शेतीचे रब्बी हंगामाचे भरणपोषण होते आणि वर्षभर बागायतीसाठी १५ एकरला पुरेल एवढे जिवंत साठ्याचे पाणी एक वड किंवा पिंपळ पुरवतो.म्हणुन आपल्या शेताच्या शेजारी मोकळी पडीक जागा असेल तर किमान एक असा वटवृक्ष लावणे गरजेचे आहे.



विशाल महाकाय वटवृक्ष नामशेष होत असल्याने त्यावर बागडणारे पक्षीही नामशेष होत आहेत.घुबड, कावळे, घार, गिधाड, कबुतर, चिमण्या, पारवे,पोपट, बुलबुल आदि वडफळांवर ताव मारण्यासाठी झाडांवर खेट्या मारताना दिसतात.वडाची बारीक बारीक फळे हे पक्षांचे अन्न आहे त्यामुळे त्यांचे अस्तित्व या झाडांवर अवलंबून आहे.तृयांच्या विष्ठेतून बाहेर पडणाऱ्या बियांमुळे परागी भवनाचे काम होते.झाडांच्या बिया अन्य ठिकाणी रूजुन पर्यावरण संवर्धनास मदत होते.परिसरात वडाच्या झाडाचे अस्तित्व असणे हे त्या परीसरात पर्यावरण समतोल असल्याचे द्योतक आहे.वडाच्या पारंब्या जमिनीत रूजुन नविन झाड तयार होते.मात्र हल्ली वटवृक्ष नामक्षेष होण्याच्या मार्गावर असल्याने वटवृक्षावर बागडणा-या पक्ष्यांचा किलबिलाट आता दुर्लभ झालाय. बीड जिल्ह्यातील धुळे ते सोलापूर, अहमदपूर ते अहमदनगर तसेच बीड अहमदनगर,बीड ते परळी राष्ट्रीय महामार्ग आणि राज्यमार्ग रस्ते रूंदीकरण कामांसाठी शेकडो वर्षे वय असलेल्या मोठमोठ्या वृक्षांची अक्षरक्ष: कत्तल करण्यात आली.त्या बदल्यात रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करणे बंधनकारक असताना काही ठिकाणी कागदोपत्रीच तर काही ठिकाणी झुडुपांची लागवड करण्यात आली.मराठवाड्यात रस्ते विकास कामात निसर्ग आणि वृक्षसंपदेची मोठी हानी झाली.शासनाकडुन २०१८ मध्ये १३ कोटी आणि २०१९ मध्ये ३३ कोटी वृक्षलागवडीची मोहीम राबविण्यात आली मात्र त्यात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याने मराठवाड्यात झाडे दिसुन येत नसुन वाळवंट होण्याच्या मार्गावर असताना शासनकर्ते याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत आहेत तर ज्यांची जबाबदारी आहे ते वनविभागच भ्रष्टाचारामुळे गोत्यात आलं आहे.याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

# महादेव कोळी समाज मतदानावर बहिष्कार टाकणार- गाडेकर

माजलगाव । प्रतिनिधी

राज्यात सर्वात मागास असलेला आदिवासी महादेव कोळी समाजाला सर्वच पक्षाने केवळ मतांपुरता वापर करत नेहमीच उपेक्षित ठेवले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील हजारो समाजाचे मतदार मतदानावर बहिष्कार टाकणार असल्याचे युवक जिल्हाध्यक्ष मुंजाराम गाडेकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे.

जिल्हाध्यक्ष मुंजाराम गाडेकर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की महाराष्ट्रात महादेव कोळीची आदिवासी मागास प्रवर्गात समावेश होतो. समाजातील नागरिकांची सर्वच गावात कोळी, महादेव कोळी, कोळी महादेव अशी ओळख आहे पण समाजातील नागरिकांना जातीचा दाखला देखील मिळण्यास सतत अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याचा परिणाम म्हणून समाज शिक्षणापासून कोस मैल दूर रहात आहे. बीड जिल्ह्यात कोणत्याच तालुक्यात समाजाचे साधे सभागृह देखील नाही. सत्ताधाऱ्यांनी नेहमी समाजाला सवतीची वागणूक दिली आहे. जातीचा दाखला, व्हॅलिडीटी, आर्थिक महामंडळ अशा कोणत्याच सुविधा शासनाकडून मिळत नसल्याने बीड जिल्ह्यातील हजारो समाजाचा मतदार लोकसभा निवडणुकीत बहिष्कार टाकणार असल्याचे बीड जिल्हाध्यक्ष मुंजाराम गाडेकर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे

# माजलगाव मठात वीरशैव लिंगायत सामूहिक विवाह सोहळा

माजलगाव। प्रतिनिधी

मागील ४५ वर्षापासून माजलगावकर मठात लिंगैक्य श्री प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य नेतृत्वाखाली वीरशैव लिंगायत समाजातील जाती पोट जातीसाठी सामूहिक विवाह सोहळ्याची परंपरा चालू होती दरम्यानच्या काळात काही वर्षे ही परंपरा खंडित झाली होती आता नूतन पट्टाधिकारी श्री ष. ब्र.चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे नेतृत्वात माजलगाव मठात पहिला सामूहिक विवाह सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न करून सामूहिक विवाह सोहळ्याची ही परंपरा यावेळी पुनश्च सुरू करण्यात आली.यावेळी जिल्ह्याच्या खासदार डॉ.प्रितम मुंडे,रमेशराव आडसकर,अरुण राऊत, माजी नगराध्यक्ष अशोक तिडके,पत्रकार तुकाराम येवले सह अनेक मान्यवर उपस्थित होते.



मराठवाड्याला सामूहिक विवाह सोहळ्याची प्रेरणा देणारे माजलगावकर महाराज सदगुरू मिस्कीन स्वामी संस्थान मठ माजलगाव येथे लिं.श्री ष.ब्र.प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांनी १९७८ पासून वीरशैव लिंगायत सामूहिक विवाह सोहळ्याची परंपरा सुरू केली होती, मराठवाडा नेमकाच १९७२ च्या दुष्काळातून सावरला होता,त्यावेळी सामान्य माणसाचे सरासरी उत्पन्न फार कमी होते, मुला मुलींचे लग्न करणे म्हणजे कर्ज काढणे शिवाय पर्याय नव्हता अशा परिस्थितीत सामूहिक विवाह आयोजित करून लग्नातील अनाठायी खर्च कमी करणे हुंडा व दाग दागिने आहेराचे खर्च कमी करणे,लग्नातील जेवणावळीवर मर्यादा आणून लग्न कार्यातील अनेक रूढींना लगाम लावणे फार मोठे आव्हान होते परंतु हे सर्व आव्हाने स्वीकारून अनेक सामूहिक विवाहांचे माजलगावकर महाराजांनी यशस्वी आजोजन केले होते अनेकांच्या संसाराला हातभार लावण्याचे सामाजिक कार्य त्यांनी केले तत्कालीन परिस्थितीत मराठवाड्यात सामूहिक विवाह सोहळ्याला प्रोत्साहन देणारे माजलगावकर महाराज एकमेव महर्षी ठरले. आज त्यांच्याच प्रेरणेने माजलगाव मठाचे शिवाचार्य श्री ष.ब्र.चंद्रशेखर स्वामीजी यांनी लिंगायत समाजातील असंख्य शिष्यांच्या सहभागाने सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले होते आजच्या या सामूहिक सोहळ्यात एका गरीब होतकरू मंदे व काटकर यांच्या कुटुंबातील पूजा व संदीप या जोडप्याचे विधिवत लग्न लाऊन देण्यात आले. यावेळी समाजातील अनेकांनी या नव दाम्पत्याला संसारोपयोगी भेट वस्तू दिल्या.सामूहिक विवाह सोहळ्याची माजलगाव मठाची ही परंपरा या पुढे ही चालू ठेवण्याचा निर्धार या प्रसंगी श्री गुरु चंद्रशेखर स्वामीजी यांनी केला.

# चला करू मतदान-मतदान-मतदान मतदान जनजागृती ठरतेय लक्षवेधी

परळी । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदानाकरिता मतदार जनजागृती करण्यासाठी सर्वच पातळीवर मोठे पर्यंत सुरू आहेत. जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली परळी उप विभागीय कार्यालय, तहसील कार्यालय यासह सर्वच शासकीय कार्यालयाकडून लोकसभेच्या १३ मे रोजी होणाऱ्या मतदानाकरिता मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले.याच्याच भाग म्हणून शहरात नगर परिषदेमार्फत करण्यात घेणारी जनजागृती चांगलीच लखवेधी ठरत आहे.

१३ मे रोजी होणाऱ्या लोकसभेकरिता मतदान टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविले जात आहेत.

उपविभागीय कार्यालय, तहसील कार्यालय, नगर परिषद यासह शासकीय, निम शासकीय कार्यालय, स्वयं सेवी संघटना ह्या सर्वच या कामी पर्यंत करत आहेत. सायक्लोथान, मानवी साखळी, सेल्फी पॉईंट, वर्दळीच्या ठिकाणी लावण्यात आलेले फ्लेक्स यासह अनेक शाळा, महाविद्यालयात रांगोळी, मतदान अधिकार असे उपक्रम मतदारांना जागरुक करत आहेत. परळी शहरातील नगर परिषदेकडून मतदार जागरूक करण्यासाठी हाती घेतलेला उपक्रम सर्वासाठी लक्षवेधी ठरत आहे.

शहरातील सर्वच भागात सकाळी ओला कचरा-सुखा कचरा संकलन करत असलेल्या घंटा गाडीवर असलेल्या स्पीकर वरून मुख्य निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दीपा मुधोल-मुंडे यांचा मतदार जागृती करणारा संदेश ऐकवून प्रसिद्ध हिंदी गाणे असलेल्या व्हाय डज कोलावरी कोलावरी कोलावरी या गाण्याच्या थीम वर बनवलेले चला करू मतदान, मतदान, मतदान हे गाणे सकाळीच नागरिकांचे डोळे उघडून मतदाराना मतदानाकरिता जागरूक करत आहे.


## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.६६५/२०२४**

**मंदा भिमराव काशिद विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, साक्षाळपिंप्री ता. जि. बीड**

**पहा मंदा भिमराव काशिदरा. अव्वलपुर. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मंदा भिमराव काशिद** यांचा दिनांक १०/०६/१९८७ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्म यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास अव्वलपुर ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे अव्वलपुर ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०२/०५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०४/०६/२०२४ ही आहे.**

मार्फत **ॲड. मिलिंद उबाळे** — स्वाक्षरित **तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१४२/२०२४**

**दादासाहेब पि.अण्णाभाऊ उबाळे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, चऱ्हाटा ता. जि. बीड**

**पहा दादासाहेब पि.अण्णाभाऊ उबाळे रा. चऱ्हाटा. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत गणपती नाना उबाळे** यांचा दिनांक १५/०२/१९४५ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास चऱ्हाटा ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे चऱ्हाटा ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०७/०५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १०/०६/२०२४ ही आहे.**

मार्फत **ॲड. मिलिंद उबाळे** — स्वाक्षरित **तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१४२/२०२४**

**कानिफनाथ पि.शाहुराव उबाळे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, चऱ्हाटा ता. जि. बीड**

**पहा कानिफनाथ शाहुराव उबाळे रा. चऱ्हाटा. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत लाला पि.नाना उबाळे** यांचा दिनांक १०/०४/१९४० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास चऱ्हाटा ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे चऱ्हाटा ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०७/०५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १०/०६/२०२४ ही आहे.**

मार्फत **ॲड. मिलिंद उबाळे** — स्वाक्षरित **तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१४१/२०२४**

**भिमराव पि.तुळशिराम काशिद विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, साक्षाळपिंप्री ता. जि. बीड**

**पहा भिमराव पि. तुळशिराम काशिद रा. साक्षाळपिंप्रीता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत बंपाजी पि.रावजी काशिद** यांचा दिनांक ०१/०१/१९३५ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास साक्षाळपिंप्री ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्री ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०७/०५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १०/०६/२०२४ ही आहे.**

मार्फत **ॲड. मिलिंद उबाळे** — स्वाक्षरित **तहसिलदार, बीड**

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

बुधवार दि.८ मे २०२४ | ६

# जिजाऊंच्या माहेराहून खा. प्रतापराव जाधव पंकजाताई मुंडेंच्या प्रचारासाठी बीडमध्ये

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रमाता जिजाऊंचे माहेर असलेल्या बुलढाणा जिल्हयाचे खासदार आणि शिवसेनेचे लोकसभेचे उमेदवार खासदार प्रतापराव जाधव भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी आज बीडमध्ये आले. पंकजाताईंच्या एका सभेमुळे माझ्यासारखे अनेक नेते निवडून येतात अशा शब्दांत त्यांनी पंकजाताईंचा नेतृत्व बीडसाठी किती महत्वाचे आहे हे अधोरेखित केले.

पंकजाताई मुंडे यांच्या राज्यभरातील जनसंपर्कमुळे त्यांना मानणारा प्रचंड मोठा वर्ग एका शब्दावर विश्वास ठेवत तो देतील तो उमेदवार निवडून आणतात हा आमचा अनुभव आहे. माझ्यासारखे अनेक जण पंकजाताई मुंडे यांच्या सक्षम नेतृत्वामुळे लोकसभा निवडणूक असो की विधानसभा या निवडणुकीत विजयी होतात. पंकजाताई आमच्यासाठी सभा घेतात त्यामुळे त्या निवडणूक लढवत असलेल्या बीड जिल्ह्यात मासाहेब जिजाऊंच्या माहेरातून प्रतापराव जाधव हे खास पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी आज पिंपळनेर येथे आले होते.

भाजप-महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या प्रचारार्थ संपूर्ण जिल्हा पिंजून काढला



**पंकजाताईंच्या एका सभेमुळे आम्ही निवडून येतो -खा. जाधव**

आहे.ठीकठिकाणी होणाऱ्या बैठका, पदयात्रा जाहीर सभा या सर्वच ठिकाणी मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. पंकजाताई मुंडे या लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारांचा वारसा घेऊन समाजकारण आणि राजकारण समर्थपणे करत आहेत. सर्व,धर्म,समभाव ही शिकवण घेऊन पंकजाताई सर्व जाती धर्माच्या लोकांना सन्मान देऊन विकासाचे राजकारण करतात.

गेले कित्येक वर्ष आम्ही दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब आणि त्यांच्यानंतर पंकजाताईंच्या नेतृत्वाखाली काम करत आहोत. बीड लोकसभा निवडणुकीत पहिल्यांदाच पंकजाताई मुंडे सामोरे जात आहेत. पंकजाताईंच्या एका सभेमुळे माझ्यासारखे अनेक जण निवडून येतात हा इतिहास आहे. त्यांचे विचार, काम करण्याची पद्धत आणि उस्फुर्त भाषण मतदारांना भावते.

पंकजाताईंमुळे आम्ही निवडून येतो

भाजप महायुतीकडून लोकसभा निवडणुकीला सामोरे जाणारे सुजय विखे पाटील, खा. रावसाहेब दानवे पाटील असो की, सुधाकर शृंगारे, बबनराव लोणीकर तानाजी मुटकुळे, मेघनाताई बोर्डीकर असे कितीतरी नेते पंकजाताईंमुळे निवडून येतात हा इतिहास आहे. आज त्यांच्यासाठी आम्ही प्रचारात उतरलो आहोत. त्या विक्रमी मताधिक्य घेऊन विजयी तर होणारच आहेत पण त्यांच्या पाठिशी आपण सर्व जण एकजुटीने उभे रहावे. जिल्ह्यासाठी त्यांच्या नेतृत्वाची आवश्यकता असल्याचे जाध. यांनी म्हटले आहे.

## दत्ता भरणे यांची शिवीगाळ मतदार संतापले



**इंदापूर । प्रतिनिधी**

सध्या महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडत आहे. त्यामुळे प्रचारादरम्यान नेत्यांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी त्यांच्या सोशल मीडियावर एक व्हीडीओ पोस्ट केला आहे. हा व्हीडीओ इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे यांचा असून सध्या हा व्हीडीओ सोशल मीडियावर खूपच व्हायरल होत आहे.

या व्हायरल होणाऱ्या व्हीडीओमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार दत्तात्रय भरणे हे मतदान केंद्रावर एका व्यक्तीशी भांडत असल्याचे दिसत आहे. त्याचप्रमाणे दत्तात्रय भरणे हे पवार गटाचे काम करणाऱ्या व्यक्तीला शिवीगाळ देखील करत असल्याचे या व्हीडीओमध्ये दिसत आहे. तुम्हाला माझ्याशिवाय कोणी नाही. मलाच तुमच्या मदतीला यावे लागेल, असे वक्तव्य दत्तात्रय भरणे या व्हीडीओमध्ये करत आहेत.

## संविधान वाचविण्यासाठी लोक एकत्र- आ.संदीप क्षीरसागर

**बजरंग सोनवणेंच्या प्रचारार्थ शहर आणि ग्रामीण भागात कॉर्नर सभा**

**बीड । प्रतिनिधी**

इंग्रजांना या देशातून हाकलून देण्यासाठी ज्याप्रकारे लोक एकत्र आले होते त्याचप्रकारे आता सविंधानाचे रक्षण करण्यासाठी भाजपाला हाकलून देण्यासाठी सर्व जातीधर्माचे लोक एकत्र आले आहेत. आणि इतिहासात ज्याप्रकारे सर्व भारतीयांनी मिळून देशाला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त केले त्याचप्रकारे आताही सर्व देशवासी मिळून भाजपाच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करणार आहेत. असे प्रतिपादन आ.संदीप क्षीरसागर यांनी बजरंग सोनवणेंच्या प्रचारार्थ झालेल्या कॉर्नर सभांमध्ये केले.

सध्या बीड मतदारसंघातील शहर आणि ग्रामीण भागात जाऊन महाविकास आघाडीचे लोकसभा उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी आ.संदीप क्षीरसागर कॉर्नर सभा घेत आहेत. दरम्यान सोमवारी (दि.७) रोजी सायंकाळी बीड शहरातील पेठ बीड



भागातील बालाजी मंदिर येथे व सुभाष रोड येथे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे, माजी मंत्री सुरेश नवले व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत कॉर्नर सभा झाली. तसेच मंगळवार (दि.७) रोजी बीड तालुक्यातील विविध गावांमध्ये तसेच शहरातील नवा मोंढा येथे आ.संदीप क्षीरसागर यांनी कॉर्नर बैठका घेतल्या. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.सुनील धांडे तसेच स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्याचा नावलौकिक वाढवण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना ऐतिहासिक मताधिक्य द्या -रमेशराव आडसकर

**माजलगाव । प्रतिनिधी**

जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करून नावलौकिक वाढवण्यासाठी भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना ऐतिहासिक मताधिक्य देऊन विजयी करा असे आवाहन भाजपचे जेष्ठ रमेशराव आडसकर यांनी केले. सांडस चिंचोली येथे महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी बैलगाडीमधून फेरी काढून मतदारांशी सवांद साधला. मतदारांनी भरघोस प्रतिसाद दिला. पंकजाताई मुंडे यांनाच विक्रमी मतांनी निवडून देणार असल्याची ग्वाही दिली.

बीड लोकसभेच्या भाजपा - शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेस - रिपाई -



रासप - मनसे महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आज सांडस चिंचोली येथे बैल गाडीतून प्रचार फेरी काढून मतदारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना आडसकर म्हणाले की, पंकजाताई मुंडे यांना विकासाची दृष्टी आहे. बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री आणि राज्याच्या मंत्री असताना त्यांनी विविध विकास कामे मार्गी लावली असून त्यांच्या अनेक योजना जलसंधारणाच्या कामाने राज्यातील पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे आपल्या शेतामध्येही पाणी पातळी वाढली आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. जिल्ह्यात उद्योग आणून तरुणांच्या हाताला काम देण्याची क्षमता पंकजाताई मुंडे यांच्यामध्ये आहे म्हणून मतदारांनी कोणत्याही भूलथापांना आणि दिशाभूलांना बळी न पडता पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी ताकत उभी करावी असे आवाहन आडसकर यांनी केले. यावेळी भाजपचे जेष्ठ नेते डॉ. प्रकाशराव आनंदगांवकर, तालुकाअध्यक्ष आरुण राऊत मा. नगरअधक्ष डॉ. अशोकराव तिडके, आनंतराव शेंडगे, भरत सोळंके, हरिभाउ चंदनशीव, नारायण शेजुळ, महेश भोसले आदी उपस्थीत होते. या प्रचारफेरी ला मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत पंकजाताई यांना प्रचंड मताने विजयी करू असा शब्द मतदारांनी एकमुखी दिला.

## एलईडी व्हॅन, कलापथक हायटेक प्रचाराने अशोक हिंगे पाटील यांचे गॅस सिलेंडर पोहोचले घराघरात

**बीड। प्रतिनिधी**

बीड लोकसभा प्रचाराचा तिसरा म्हणजे अंतिम टप्पा चालू असून यामध्ये विविध प्रकारे आयडिया करून आपले चिन्ह घराघरापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करत आहेत त्यानुसार वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोकराव हिंगे पाटील यांनी एलईडी व्हॅन कलापथकच्या माध्यमातून हायटेक प्रचार करत घराघरात जनतेच्या मनामनात गॅस सिलेंडर पोहोचवले आहे.

बीड लोकसभा मतदार संघातील उमेदवाराच्या प्रचाराचा अंतिम टप्पा चालू असून प्रचाराचे रणधुमाळी जोरात चालू आहे विविध प्रकारे डोकेलिटी लढवत आयडियल आणि हायटेक प्रचार करून आपली चिन्ह घराघरापर्यंत पोहोचवण्याचं काम उमेदवार करत असून वंचित बहुजन आघाडीचे



उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी गेवराई आणि बीड येथे अडकत प्रकाश आंबेडकर यांच्या सभांचे आयोजन करून मतदारांचे मन परिवर्तन मत परिवर्तन करण्याचे नियोजन आखले आहे तर एलईडी व्हॅनच्या माध्यमातून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी केलेले कार्य तसेच वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड.प्रकाश आंबेडकर यांनी वंचित दिन दलित दुबळे यांच्यासाठी केलेले कार्य या सर्व गोष्टीवर प्रकाश टाकणारे चित्रफीत एलईडी व्हॅनच्या माध्यमातून गावागावातील मतदारांना दाखवली जाते कला पथकाच्या माध्यमातून प्रकाश आंबेडकर हे दिन दलित दुबळ्याचे नेते आहेत हे गीतांच्या माध्यमातून जनतेसमोर सादर करत हायटेक प्रचार करून वंचित बहुजन ◀◀ पान ३ वर

## ओबीसी मताचे विभाजन टाळण्यासाठी माझी लोकसभा निवडणुकीतून माघार

**पंकजाताईसाठी जीवाचं रान करणार-संतोष रासवे**

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदारसंघात माळी समाजाचे युवा कार्यकर्ते संतोष रासवे यांनी उमेदवारी दाखल केली होती मात्र यामुळे ओबीसी मताचे विभाजन होऊन त्याचा फटका पंकजाताई मुंडे यांना बसू शकतो ही बाब लक्षात घेऊन उमेदवारी अर्ज माघारी घेतला असल्याचे संतोष रासवे यांनी सांगितले पंकजाताई मुंडे यांच्यासाठी जीवाचे रान करून निवडून आणून बीड जिल्ह्याच्या विकासाचे स्वप्न साकार करणार असल्याचे संतोष रासवे यांनी सांगित



पुढे बोलताना संतोष रासवे म्हणाले बीड जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकीने जातीय रंग धारण केला आहे मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे जिल्ह्यात दूषित वातावरण निर्माण झाले आहे मराठा समाज सतत ओबीसीचा मोठा भाऊ या भूमिकेतच राहिलेला आहे मात्र जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाने जिल्ह्यातच नाही तर महाराष्ट्रात दूषित वातावरण निर्माण झाले आहे स्वर्गीय मुंडे साहेबांनी भारतीय जनता पार्टी बामना भुताचा पक्ष म्हणून ओळखला जायचा तो बहुजनांचा पक्ष बनविला यामुळे मराठा साळी माळी कोळी हटकर धनगर वंजारी मुस्लिम ◀◀ पान ३ वर

## पारदर्शक कारभार असणाऱ्यांना निवडून द्या

**मतदानात चुकाल तर विकास होणार नाही -ॲड.अजित देशमुख**

**बीड । प्रतिनिधी**

पारदर्शक कारभार करणारे लोक प्रतिनिधी म्हणून पुढे आले पाहिजेत. भ्रष्ट आचार. भ्रष्ट विचार आणि भ्रष्ट कारभार हा लोकशाहीला घातक आहे. यावर जनताच सातत्याने चर्चा करते आणि ती चर्चा होणे आवश्यक आहे. मात्र भ्रष्टाचार थांबायचं असेल तर चांगला कारभार असणाऱ्या व्यक्तीला निवडून देणे आवश्यक आहे. त्यामुळे पारदर्शक कारभार करण्याची हमी देणाऱ्याला जनतेने मत द्यावे. त्याची पार्श्वभमी तपासावी. तरच जिल्ह्याचा विकास होईल, असे आवाहन जनआंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी मतदारांना उद्देशून केले आहे.

वाढती गुंडगिरी आणि वाढता भ्रष्टाचार, सामान्य जनतेच्या हिताचा राहिलेला नाही. आज



कोणतीही फाईल बिना भ्रष्टाचाराची पुढे जाताना दिसत नाही. अर्थात सर्वच कार्यालयात अशी परिस्थिती नसली तरी देखील अँटी करप्शन खात्याने केलेल्या कारवाया पाहता भ्रष्टाचार किती प्रमाणात बोकाळत चाललेला आहे, हे दिसते. त्यामुळे या सर्वांचा मतदाराने बारकाईने अभ्यास करणे आवश्यक आहे.

मत देताना जात, धर्म, पंथ, या गोष्टी पाहणे योग्य नाही. मात्र बरबटलेल्या परिस्थितीमध्ये याच मुद्द्यावर चर्चा होताना दिसत आहे. याला पुढारी देखील तेवढेच जबाबदार आहेत. मतदारांनी पुढाऱ्यांना जाब विचारने देखील आवश्यक आहे. मात्र मतदार पुढे येऊन प्रश्न विचारत नाहीत. त्यामुळे निवडणुकीतील मुद्दे देखील भरकटले असल्याचे दिसत आहे. सामान्य जनतेचे प्रश्न अत्यंत लहान आहेत. मात्र त्याकडे लोकप्रतिनिधींचे म्हणावे एवढे लक्ष नसल्याने आजही पिण्यासाठी पाणी उपलब्ध नाही. कडक उन्हाळ्यामध्ये पाण्याची ही बोंब असताना पाण्यासाठी आलेला पैसा गेला कुठे ? आमच्या गावात पाण्याची योजना का राबवली नाही ? या सर्व गोष्टींचा उहपोह निवडणुकीत झाला पाहिजे. मतदारांनी पुढाऱ्यांना या प्रश्नावर प्रश्न विचारले ◀◀ पान ३ वर

## नाशिक लोकसभेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मैदानात, आज मेळावा

**नाशिक । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा जोर आता चढू लागला असून, महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे यांच्या प्रचारासाठी खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाशिकच्या मैदानात उतरले आहेत. बुधवारी (दि. ८) मुख्यमंत्री शिंदे नाशिकच्या दौऱ्यावर येत असून, त्यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक होत आहे. या बैठकीच्या माध्यमातून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहणाबरोबरच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षसंघटनेची मरगळ झटकण्याचा प्रयत्न मुख्यमंत्र्यांकडून केला जाणार आहे.

उमेदवारी अर्ज माघारीनंतर आता खऱ्या अर्थाने प्रचारयुद्ध सुरू झाले आहे. निवडणुकीचे रण आता चांगलेच तापले आहे. नाशिकमध्ये



महाविकास आघाडीच्या तुलनेत महायुतीची उमेदवारी जाहीर करण्यात विलंब झाला. त्याचा परिणाम महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारावर झाला असून, प्रचारासाठी आता अवघे ११ दिवस उरले आहेत. नाशिक लोकसभा मतदारसंघातील सिन्नर, इगतपुरी, देवळाली, नाशिक पूर्व, नाशिक पश्चिम व नाशिक मध्य या सहा मतदारसंघांत प्रचार करताना उमेदवाराची दमछाक होणार आहे. त्यातच मोठ्या संघर्षातून महायुतीची नाशिकची जागा शिंदे गटाला मिळाली असल्याने महायुतीतील घटक पक्षांमधील नाराजीचा सूर कायम आहे. विशेषत: राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांना उमेदवारी मिळू न शकल्याने ओबीसी समाज कमालीचा नाराज आहे. त्याचा फटका महायुतीच्या उमेदवाराला बसण्याचा धोका आहे. भाजपतही अंतर्गत धुसफूस आहे. शिंदे गटातही काही प्रमाणात नाराजी आहेच. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांनी कल्याण, ठाण्यानंतर नाशिकच्या जागेकडे लक्ष केंद्रित केले आहे. महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे यांना या निवडणुकीत विजयाची हॅट्ट्रिक साधण्याची संधी आहे. सलक दोन वेळा खासदार राहिलेले गोडसे तिसऱ्यांदा निवडून आल्यास केंद्रीय मंत्रिपदाची लॉटरी त्यांना लागू शकते. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांनी गोडसे यांची निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे.

## मोदींच्या हुकूमशाहीला गाडण्यासाठी बजरंग बप्पांना लाखोंच्या मताने विजयी करा -परमेश्वर सातपुते

**आष्टी । प्रतिनिधी**

येथे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे, महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे,शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम,माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी आमदार लोकसभा प्रमुख सुनील धांडे,जैष्ट नेत्या सुशीला मोराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आष्टी शहरातील ईदगाह मैदानावर जाहीर



सभा आयोजित करण्यात आली होती.

याप्रसंगी बोलताना शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते म्हणाले की

केंद्रातील मोदी शहा आणि राज्यातील मींधे सरकार ला लोकसभा निवडणुकीत पराभव समोर दिसत असल्यामुळे त्यांच्या पाया खालची वाळू सरकली आहे मोदीजी प्रत्येक भाषणात म्हणतात "मेरा देश मेरा परिवार " पण त्यांच्याच परिवारातील कर्नाटक येथील उमेदवार, रेवाण्णा यांनी ३००० महीलाचे शोषण करून अत्याचार केले त्याचे व्हिडिओ काढले त्यांना मोदी सरकारने बाहेर देशात पळून जायला मदत केली त्यावर मोदी शहा काही बोलत नाही

सत्तेसाठी भाजप खालच्या थराला जातेय,शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव नाही सोयाबीन कापूस घरात ठेवलेलं आहे शेतकऱ्यांच्या गरजू वस्तूवर २८% जीएसटी लावून प्रचंड भाव वाढ केली खताच्या किमतीत भाव वाढ करून शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम मोदी सरकारने केले आहे राज्यातील जे नेते इमानदारीने आणि प्रामाणिकपणे काम करीत होते अशा नेत्यांच्या पाठीमागे ईडीसीबीआय आणि इन्कम टॅक्स धाडी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बारामतीतील मतदानानंतर शरद पवारांचा मोर्चा शिरुरकडे; अमोल कोल्हेंसाठी घेणार सभा

**पुणे । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शिरूर लोकसभेचे उमेदवार अमोल कोल्हे यांच्यासाठी उद्या म्हणजेच ८ मेला जेष्ठ नेते शिरूरमध्ये जाहीर सभा घेणार आहेत. बारामती मतदारसंघाची निवडणूक झाल्यानंतर शरद पवार शिरूर मतदार संघात सक्रिय होत आहेत. या सभेत शरद पवार काय बोलणार याकडे सगळ्यांचच लक्ष लागल आहे.

शिरूर मधील पाच कंदील चौकात बुधवारी दुपारी एक वाजता शरद पवारांची जाहीर सभा होणार आहे. या सभेला महाविकास आघाडीतील दिग्गज नेते उपस्थित राहणार आहेत. डॉ. अमोल कोल्हे यांच्या प्रचारासाठी शरद पवारांची ही तिसरी सभा आहे. लोकसभा निवडणुकीच बिगुल वाजल्यापासून डॉ. कोल्हे सातत्याने आपल्या निवडणूक प्रचारात मतदार संघातील प्रश्नांबाबत , पॉलिसी मेकिंग च्या संदर्भात मुद्दे मांडत आहेत.



एकीकडे डॉ. कोल्हे हे धोरणांवरती, मतदार संघात येऊ घातलेल्या प्रकल्पांविषयी बोलत असताना विरोधकांकडून मात्र, सातत्याने त्यांच्या विरोधात वैयक्तिक पातळीवर टीका केली जात आहे.

असं असलं तरी कोल्हे हे केवळ मुद्द्यांवरतीच बोलत आहेत. ओतूरमध्ये झालेल्या शरद पवारांच्या सभेत डॉ. कोल्हे यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या १५ वर्षाच्या खासदारकीच्या कामकाजाचा बुरखा फाडला होता. आढळराव पाटील हे स्वतःच्या कंपनीला फायदेशीर ठरतील अशा पद्धतीने संसदेत केवळ संरक्षण खात्याविषयी प्रश्न विचारत असल्याचा आरोप डॉ.कोल्हे यांनी केला होता. त्यानंतर डॉ. कोल्हे यांनी याबाबत पुरावा देणारे दोन व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केले. आता या जाहीर सभेत आढळराव पाटलांविषयी डॉ. कोल्हे आणखी कोणते गौप्यस्फोट करणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेलं आहे. आढळराव पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नांचा लेखाजोखाच डॉक्टर कोल्हे यांनी आपल्या व्हिडिओतून जनतेसमोर मांडला. त्यामुळे शिरूरमध्ये होणाऱ्या जाहीर सभेत कोल्हे आणखीन कोणते मोठे गौप्य स्फोट करणार यावर कोल्हे समर्थकांसह आढळराव पाटील यांच्या समर्थकांचेही लक्ष लागलेले आहे.त्यामुळेच शिरूर मध्ये होणारी शरद पवारांची सभा ही महत्त्वाची ठरणार आहे. दुसरीकडे बारामतीतलं मतदान झाल्यामुळे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे सुद्धा शिरूर मतदारसंघात सक्रिय होत आहेत. कोल्हे यांनी अजित पवारांनाही थेट लक्ष केलं होतं. आता शिरूरच्या सभेत कोल्हे अजित पवारांवर ती काय बोलणार याकडेही सगळ्यांचेच लक्ष लागलेलं आहे..

# राज्यातील गड, किल्ल्यांचे करणार संवर्धन : मुरलीधर मोहोळ यांचे आश्वासन

पुणे : : छत्रपती श्रीशिवाजी महाराज यांच्या विचारांशी कधीही तडजोड केली जाणार नाही. तसेच राज्यातील गडकोट आणि दुर्गांच्या संवर्धनाचे काम कर्तव्य भावनेतून मी करीन, असे आश्वासन महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी दिले.

शहरातील सकल हिंदू समाजाच्या २७ हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने मोहोळ यांच्या समर्थनार्थ हिंदू जनसंवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री शंकर गायकर यांनी श्रीराम मंदिराचा संघर्ष मांडताना हिंदू म्हणून संघटित राहण्याचे आवाहन केले.

मोहोळ यांनी भाषणात नरेंद्र मोदी यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करताना पुण्याच्या संस्कृती रक्षणाची व विकासाची गॅरंटी पटवून दिली. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मान्यता मिळण्यासाठी भारत



सरकारकडून श्रीशिवाजी महाराज यांच्या काळातील १२ किल्ल्यांचे नामांकन पाठवण्यात आले आहे. रायगडासह साल्हेर किल्ला, शिवनेरी किल्ला, लोहगड, खांदेरी किल्ला, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा किल्ला, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि तामिळनाडूतील जिंजी या किल्ल्यांचा त्यात समावेश आहे. या यादीतील बहुतांश किल्ले सह्याद्रीच्या परिसरातील आहेत.

सतराव्या ते एकोणीसाव्या शतकादरम्यान बांधलेल्या या किल्ल्यांच्या माध्यमातून मराठा राजवटीच्या सामरिक लष्करी शक्तीचे दर्शन होते. या आणि अशा अनेक किल्ल्यांच्या मदतीने श्रीशिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. या किल्ल्यांचे जतन, संवर्धनाचे काम मी कर्तव्य भावनेतून करीन, अशी ग्वाही मोहोळ यांनी दिली. मेळाव्यात किशोर चव्हाण, पराग ठाकुर, दीपक नागपुरे, स्वप्नील नाईक, लोकेश कोंढरे, संजय भोसले, किशोर येनपुरे, श्रीकांत शिळीमकर, अनिकेत हरपुडे यांनी मुरलीधर मोहोळ यांना पाठिंबा जाहीर करून मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन महेश पवळे यांनी केले.

# फिरोदिया करंडक स्पर्धेत ‘पीसीसीओई’चा बोलबाला!

पिंपरी, पुणे । प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या फिरोडिया करंडक स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या (पीसीसीओई) आर्ट सर्कल संघाने चार पारितोषिके पटकावत उल्लेखनीय यश मिळवले. प्रसिद्ध संगीतकार अजय अतुल यांच्या हस्ते पारितोषिक वितरण सोहळा पार पडला.

आर्ट सर्कल संघाने स्पेशल इफेक्ट्स, इंस्ट्रुमेंट प्ले - मेलोडिका, वाद्य वाजवणे - काँगो, फ्रीस्टाइल नृत्य या चार प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला.

प्रा. श्रीयश शिंदे आर्ट सर्कल प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कशौनीश बोरकर, कृष्णा कलासपूरकर, सोहम ब्राह्मणकर, निधी वर्तक, शंतनु सोनार, आशुतोष ताकपिरे, प्रणम्या राजीवन, तन्वी शिंपी, श्रृष्टी सरोदे, आर्या दाभोलकर, प्रफुल्ल गुंजाळ, केदार फुल्सवांगे, आर्या देशपांडे, ओंकार पडवळकर, समृध्दी निंबाळकर, आयुष देशमाने यांनी उल्लेखनीय काम केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील,




उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, डीन एस. डी. डब्ल्यू. डॉ. प्रवीण काळे यांनी आर्ट सर्कल संघातील विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मतदान केंद्र थेट पोहोचले ज्येष्ठांच्या घरी; ‘या’ वयोगटातील मतदारांसाठी खास सुविधा

**पुणे । प्रतिनिधी**

मतदान केंद्रच घरी पोहोचले अन् ८८ वर्षे वय असलेल्या लीला भट यांना घरीच मतदानाचा अधिकार बजावता आला. वयोमानामुळे मागील वर्षी त्यांना मतदान करता आले नाही. पण, यंदा घरीच मतदान करता आल्याने त्या आनंदी होत्या. मतदान केल्याचे समाधान त्यांच्या चेहर्यावर होते अन् बोटाला लावलेल्या शाईचा हात दाखवत त्यांनी आनंदही व्यक्त केला.

निवडणूक आयोगाकडून ८५ वर्षांपुढील ज्येष्ठ नागरिकांसाठी घरातूनच मतदान (होम वोटिंग) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याअंतर्गत सोमवारी (दि. ६) लीला भट यांच्याप्रमाणे शिवाजीनगर येथे राहणार्या काही ज्येष्ठांनीही मतदान केले. वयोमानामुळे, आजारपणामुळे किंवा दिव्यांगत्वामुळे ज्या ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रापर्यंत येणे




शक्य नाही, अशा ज्येष्ठांसाठी निवडणूक आयोगातर्फे घरातूनच मतदानाची (होम वोंटिगची) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. लोकसभा निवडणुकीमध्ये पुण्यात विविध ठिकाणी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, याची सुरुवात सोमवारपासून (दि. ६) झाली. सकाळी नऊ ते सायंकाळी सहापर्यंत ज्येष्ठांसाठी ही सुविधा उपलब्ध करून दिली. शिवाजीनगर भागातील भांडारकर रस्ता, प्रभात रस्त्यासह ठिकठिकाणी अशा पद्धतीने ज्येष्ठांना घरीच मतदान करता आले.

निवडणूक अधिकारी, पोलिस, व्हिडीओग्राफर अशी काही जणांची टीम टप्प्याटप्प्याने ज्या ज्येष्ठ नागरिकांनी या सुविधेसाठी नोंदणी केली होती त्यांच्या घरी पोहोचले. त्यानंतर त्या ज्येष्ठांच्या घरी मतदानासाठीची संपूर्ण यंत्रणा उभी करण्यात आली. शिवाजीनगर भागात जवळपास ४० हून अधिक ज्येष्ठांनी घरीच मतदान केले, तर काही दिव्यांग व्यक्तींनीही मतदान केले. मंगळवारी आणि बुधवारीही ज्येष्ठांसाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. लीला भट म्हणाल्या, गेल्या वर्षी मतदान करता आले नाही. वयोमानामुळे ते शक्य झाले नाही. पण, मतदान यंत्रणा घरीच पोहोचल्यामुळे मतदानाचा अधिकार बजावता आल्याचा आनंद आहे. लीला भट यांचे पुत्र राजेश भट यांनीही आनंद व्यक्त केला.

# गुंडाळलेला स्मार्ट सिटी प्रकल्प आम्ही मार्गी लावू : रवींद्र धंगेकर

पुणे :केंद्र सरकारने गुंडाळलेला पुणे स्मार्ट सिटी प्रकल्प आम्ही मार्गी लावू आणि पुणेकरांना आशा लावण्यात आलेल्या प्रकल्पाची पूर्तता करू, अशी ग्वाही महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी दिली. प्रचारादरम्यान बोलताना धंगेकर म्हणाले, स्मार्ट सिटी प्रकल्पाचा बराच गाजावाजा केला, त्यामुळे पुणेकर काही प्रमाणात हुरळून गेले होते. पण, प्रत्यक्षात मात्र पुणेकरांच्या पदरी घोर निराशाच आली आहे. हा प्रकल्प संपूर्ण पुणे शहरासाठी नव्हता तर शहरातील केवळ एक छोटा भाग विकसित करण्याचा प्रकल्प होता, हे सुद्धा पुणेकरांना उशिराने कळाले. यासाठी पुण्यातील बाणेर- बालेवाडीचा कोपरा जो आधीच विकसित आहे तो निवडला गेला आणि तेथेही या प्रकल्पाच्या कामाची पूर्तता झाली नाही.

वास्तविक यूपीए सरकारच्या काळात जवाहरलाल नेहरू अर्बन रिन्यूअल मिशन ही योजना राबवली गेली. त्यातून शहराच्या विकासाला ५० टक्के निधी केंद्र सरकारकडून



दिला जात होता. अत्यंत उपयुक्त अशी ही योजना बंद करण्यासाठीच केंद्रातील भाजप सरकारने स्मार्ट सिटी योजना पुढे आणली आणि जेएनएनयूआरएम ही योजना बंद पाडली. त्यामुळे पुण्याला केंद्राकडून मिळणारा प्रत्येक प्रकल्पाच्या ५० टक्के निधी मिळू शकला नाही. स्मार्ट सिटी हे केवळ एक गाजर होते, हे नागरिकांच्या लक्षात आले. ही योजना आता बंद केल्याने पुणेकरांचे स्मार्ट सिटीचे स्वप्न अधुरेच राहिले. मात्र, आपण खासदार झाल्यानंतर पुन्हा जेएनएनयुआरएम स्वरूपाची योजना सुरू करण्याचा आग्रह केंद्राकडे धरू, असे धंगेकर यांनी सांगितले.धंगेकर म्हणाले, केंद्र सरकारने पुण्यात नदी सुधार योजना गाजावाजा करून हाती घेतली, त्या योजनेलाही अजूनपर्यंत वाटाण्याच्या अक्षताच लावण्यात आल्या आहेत. समान पाणीपुरवठा योजनेचा बोजवाराही अशाच पद्धतीने उडाला आहे. शहरातील अनेक उपनगरे पाणीटंचाईने त्रस्त आहेत. नागरिकांच्या या सगळ्या घोर समस्यांना काँग्रेसचे सरकार उत्तर देऊ शकते. त्यामुळे काँग्रेसला विजयी करा आणि अर्धवट विकासकामे पूर्णत्वाकडे न्या, असे आवाहन धंगेकर यांनी केले.

# डॉ. हेमंत अगरवाल यांना रक्तदान मोहिमेत उत्कृष्ठतेच्या पुरस्काराने लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड व लायन्स क्लब इंटरनॅशनल तर्फे सन्मानित

लोणावळा : डॉ. हेमंत अग्रवाल यांना लायन्स क्लब इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ - ऊ२ तर्फे डिस्ट्रिक्ट चेअरमन ब्लड डोनेशन कॅम्प चे कार्य सोपविण्यात आले होते.

१ जुलै २०२३ ते ३० एप्रिल २०२४ या काळात त्यांनी पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यात मिळून १६७ कॅम्पस केलेत. एकुण ३८५१२ बाटली रक्त संकलित केले.

प्रत्येक रक्तदात्यास पाच लाखाचा विमा (इन्शुरन्स) मोफत देऊन

आतापर्यंत ५०८ करोड रूपयांचा विमा (इन्शुरन्स) मोफत देण्यात आले.

या सर्जनशील (क्रिएटिव्हिटी) मुळे. भरपूर सामाजिक संस्थांनी सहभाग घेतला.

ऑक्टोबर २०२३ मध्ये अग्रसेन जयंतीच्या निमित्ताने २५ शिबीर (कॅम्प) घेण्यात आले. यात जवळजवळ पंधराशे लोकांनी सहभाग घेतला होता.

जानेवारी मध्ये फिटनेस मंत्र या पुण्यातील संस्थेने लायन्स क्लब इंटरनॅशनल बरोबर रक्तदान शिबिर ( ब्लड डोनेशन कॅम्प );घेण्यात आला. त्यात बाराशे लोकांनी सहभाग घेतला होता.



जानेवारी मध्ये ब्लड डोनेशन क्विझ हे संपूर्ण महाराष्ट्रात घेण्यात आली. त्यात जवळजवळ दोन लाखांचे बक्षीसे देण्यात आली. त्यात वीस हजार लोक सहभागी होते. रक्तदान शिबिर (ब्लड डोनेशन) बरोबर अनेक ठिकाणी मोफत डायबिटीस चेकअप, मोफत नेत्र तपासणी (आय चेकअप)

मोफत हेल्थ चेकअप व मोफत मोतीबिंदू ऑपरेशन करण्यात आले.

तसेच मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. पुणे, नगर आणि नाशिक अशा विविध ठिकाणी ब्लड डोनेशन सेमिनार घेण्यात आली. चित्रकला स्पर्धा ( ड्रॉइंग कॉम्पिटिशन ) घेण्यात आले.

पुण्यातील बऱ्याच ठिकाणी निबंध स्पर्धा ( ईसे कॉम्पिटिशन) घेण्यात आले.


ब्लड डोनेशन च्या माध्यमातून अनेक शहरात वेगवेगळे उपक्रम (ऍक्टिव्हिटीज) राबवण्यात आले.दहा महिन्यात जवळजवळ १६७ रक्तदान शिबिर ( ब्लड डोनेशन) काम करण्यात आले.लायन्स क्लब इंटरनॅशनल च्या माध्यमातून पहिल्यांदाच ३८५१२ बाटली रक्त संकलित ( ब्लड डोनेशन) करण्यात आले. हा एक अनोखा विक्रम ( रेकॉर्ड ब्रेकिंग) ठरला.त्याचबरोबर ५०८ करोड रुपयांचा मोफत इन्शुरन्स हा सुद्धा एक विक्रम (रेकॉर्ड ब्रेकिंग) ठरला. लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड यांनी त्याची नोंद घेऊन इंटरनॅशनल चेअरमन डॉ. अविनाश साक्रुदे यांच्यातर्फे व लायन्स क्लब इंटरनॅशनल यांच्यातर्फे पुण्यातील विमान नगर येथील सिम्बॉयसिस इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट मध्ये ५ मे २०२४ रोजी डॉ. हेमंत अग्रवाल यांना रक्तदान मोहिमेत उत्कृष्ठता (Excellence in Blood donation drive ) या लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड चा पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

# रायरेश्वर मतदान केंद्रासाठी कर्मचाऱ्यांची पायपीट

**पुणे । प्रतिनिधी**

लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक मतदार महत्त्वाचा असल्याने भोर विधानसभा मतदारसंघातील रायरेश्वर मतदान केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी लोखंडी शिडीचा वापर करून मतदान पथकाने एक तास पायी प्रवास केला. बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भोरमधील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मतदान साहित्य वाटप केंद्रावरून मतदान पथके मतदान केंद्राकडे रवाना झाली

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राजेंद्र कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ७ वाजता मतदान साहित्य वाटपाला सुरुवात झाली. या वेळी कर्मचार्यांना मतदान



प्रक्रियेबाबत माहिती देण्यात आली. भोरमध्ये सर्वप्रथम रायरेश्वर पठारावर असलेल्या मतदान केंद्रासाठी साहित्य वाटप करण्यात आले. या मतदान केंद्रावर लोखंडी शिडीच्या सहाय्याने पोहोचावे लागत असल्याने भारत निवडणूक आयोगाने कर्मचार्यांसाठी उपलब्ध करून दिलेल्या बॅकपॅकचे वितरण कचरे यांच्या हस्ते मतदान कर्मचार्यांना करण्यात आले. रायरेश्वर हे पुण्यातील सर्वांत उंचावर असलेले मतदान केंद्र असून १६० मतदारांसाठी या मतदान केंद्राची स्थापना केली आहे.

# टाटा स्मारक हॉस्पिटल येथे माजी सैनिकांची भरती

पुणे । प्रतिनिधी

टाटा स्मारक हॉस्पिटल, मुंबई येथे सुरक्षा सहाय्यक, सुरक्षा रक्षक व वाहन चालक ही पदे शैक्षणिक अर्हता धारक माजी सैनिकांकडून भरण्यात येणार असून पात्र व इच्छुक माजी सैनिकांनी https://tmc.gov.in/def/inst.aspx या संकेतस्थळावर ९ मे अखेर ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय पुणे तर्फे करण्यात आले आहे.

टाटा स्मारक हॉस्पिटल मुंबई येथे सुरक्षा सहाय्यक १ पद अराखीव, सुरक्षा रक्षक अराखीव २ पदे, इतर मागास प्रवर्ग २ पदे, अनुसूचित जाती ३ पदे, अनुसूचित जमाती ३ पदे व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग १ पद अशी ११ पदे तर वाहन चालक संवर्गातील अराखीव, इतर मागास प्रवर्ग, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील प्रत्येकी १ पद अशी ४ पदे भरती करण्यात येणार असून उमेदवारांनी भरतीचे नियम अवलोकन करून ऑनलाईन अर्ज सादर करावेत. उमेदवारांनी संकेतस्थळावर अर्ज भरल्यानंतर आवश्यक कागदपत्रे अपलोड करून जतन करावीत. अर्जाची हार्ड कॉपी पाठविण्याची आवश्यकता नाही. अधिक माहितीसाठी अर्जदारांनी मानव संसाधन विभाग भरती कार्यालय, ०२२-२४१७७००० विस्तार क्रमांक ४६२७ व ४६२७ वर संपर्क साधावा.

# भांबवडे येथे ईव्हीएम मशीन पडले बंद; मतदान प्रकिया दीड तास खोळंबली

नसरापूर : लोकसभेच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदानास दि ७ मे रोजी सकाळी ७ वाजता सुरूवात झाली भोर तालुक्यातील भांबवडे येथील बुथ क्रमांक ४५५ वर सकाळी सुरूवातीचे ५ मतदान झाल्यानंतर ई.व्ही.एम मशिन बंद पडली होती. तब्बल दीड तासानंतर पुन्हा ईव्हीएम मशीन चालू झाल्यानंतर मतदान प्रक्रिया सुरू झाली आहे. बारामती लोकसभा येथील मतदान आज होत असून सकाळी वाजेपर्यंत मतदानाची वेळ लोकशाही उत्सव



व विवाहाचे तिथी मोठ्या असल्याने अनेक गावात लग्न समारंभचे कार्यक्रम व उन्हाचा चढता परा लक्षात घेता सकाळी अकरा वाजेपर्यंत मतदारांनी रांगा लावल्या होत्या. त्यानंतर तुरळक मतदार मतदान केंद्रावर दिसत आहे. परंतु भांबवडे येथे सकाळ चे ७ वाजून १० मिनिटाला पहिले पाच मतदान झाले त्यानंतर ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड झाल्याने मतदान प्रक्रिया खोळंबल्याने ई.व्ही.एम मशीनचा संच बदलण्यात आला. मतदान ८ वाजून ५० मी पुन्हा सुरळीत सुरूवात झाली. मशिन संच बदलण्यास व मतदान प्रक्रिया सुरळीत करण्यास तब्बल १ तास ४० मी चा वेळ लागला.

# जामिनासाठी चुकीची कागदपत्रे सादर केल्याने जामीनदारावर गुन्हा दाखल

पुणे : जामिनासाठी जामीनदार म्हणून चुकीची कागदपत्रे सादर केल्याने एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार रविवारी (५ मे) दुपारी पिंपरी न्यायालयात उघडकीस आला. आकाश अशोक कांबळे (वय ३०, रा. चिखली रोड, चिंचवड) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पिंपरी न्यायालयातील सहायक अधीक्षक राजेंद्र चव्हाण यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी चव्हाण हे पिंपरी न्यायालयात सहायक अधीक्षक पदावर कार्यरत आहेत. एका गुन्ह्यात आरोपीच्या जामिनासाठी आरोपी आकाश कांबळे हा जामीनदार होता. त्याने त्याच्या नावाची म्हणून चुकीची कागदपत्रे न्यायालयात सादर केली. ही बाब चव्हाण यांच्या पडताळणी मध्ये आढळून आली. त्यामुळे आकाश कांबळे याने न्यायालयाची फसवणूक केल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंपरी पोलीस तपास करीत आहेत